शनिवार, ८ जुलै २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२९३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SATURDAY 08 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-293 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

# तीन रेल्वे अधिकाऱ्यांना अटक

## ओदिशा रेल्वे अपघात प्रकरणी सीबीआयची मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**बालासोर : ओदिशातील बालासोरमध्ये झालेल्या रेल्वे अपघात प्रकरणी सीबीआयने शुक्रवारी मोठी कारवाई केली. सीबीआयने या प्रकरणी रेल्वेच्या तीन अधिकाऱ्यांना अटक केली आहे. सीबीआयने अटक केलेल्या आरोपींमध्ये सीनियर सेक्शन इंजिनिअर अरुण कुमार महांतो, सीनियर सेक्शन इंजिनिअर मोहम्मद आमिर खान आणि टेक्निशियन पप्पू कुमार यांचा समावेश आहे.**



आरोपींविरोधात भारतीय दंड विधान कलम 304 आणि कलम 201 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मागील महिन्यात 2 जून रोजी सायंकाळी 7 वाजण्याच्या सुमारास कोरोमंडल एक्स्प्रेसने एका मालगाडीला धडक दिली होती. त्यानंतर कोरोमंडल एक्स्प्रेसचे काही डब्बे बेंगळुरू-हावडा सुपरफास्ट एक्स्प्रेसला आदळले. या भीषण अपघातात 292 प्रवाशांचा मृत्यू झाला. तर, एक हजारांहून अधिक प्रवासी जखमी झाले होते. या भीषण रेल्वे अपघातामुळे संपूर्ण देशभरात हळहळ व्यक्त करण्यात आली होती. या अपघाताची चौकशी सीबीआयकडे देण्यात आली. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर सीबीआयने तपास हाती घेतला. सीबीआयच्या चौकशी पथकाने घटनास्थळाची पाहणी केली होती.

काही दिवसांपूर्वीच रेल्वे सुरक्षा आयुक्त यांनी ओदिशातील रेल्वे अपघात प्रकरणी रेल्वे बोर्डाला स्वतंत्र चौकशी अहवाल सादर केला. या अहवालानुसार, सिग्नलिंगच्या कामात कमतरता असल्यामुळे, अपघाताच्या ठिकाणी असलेल्या बहंगा बाजार येथील स्टेशन व्यवस्थापकाने कर्मचाऱ्यांना दोन समांतर ट्रॅकमधील त्रुटींबाबत सूचना दिली असती, तर ते उपायात्मक पावले उचलू शकले असते. बहनगा बाजार स्थानकावरील लेव्हल क्रॉसिंग गेट 94 वरील 'इलेक्ट्रिक लिफ्टिंग बॅरियर' बदलण्याच्या कामासाठी स्टेशन-विशिष्ट मंजूर सर्किट सर्किट आरेख न पुरवणे हे चुकीचे पाऊल होते, ज्यामुळे चुकीची वायरिंग झाली.

टया अपघाताचे मुख्य कारण चुकीचा सिग्नल होता.' समितीने म्हटले आहे की, सिग्नलिंग आणि दूरसंचार विभागाकडून अनेक पातळीवर चुका झाल्या होत्या. आधीच्या इशाऱ्याकडे लक्ष दिले असते तर ही दुर्घटना टाळता आली असती, असेही उच्चस्तरीय समितीने म्हटलं असल्याचे वृत्त पीटीआयने दिले आहे.

# बृजभूषण सिंह यांना कोर्टाचे समन्स


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष आणि भाजपा खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांना कोर्टाने समन्स बजावले आहे. त्यामुळे आता त्यांना कोर्टात हजर रहावे लागणार आहे. सहा महिला कुस्तीगीरांनी ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप केले आहेत. आता १८ जुलै रोजी ब्रिजभूषण शरण सिंह यांना कोर्टात हजर रहावे लागणार आहे.

राऊज एव्हेन्यू कोर्टाने WFI चे सहाय्यक सचिव विनोद तोमर यांनाही समन्स जारी केला आहे. ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात पोलिसांनी जी कलमं लावली आहेत ते सगळे गंभीर अपराध आहेत. या कलमांमध्ये कलम ३५४ ही आहे. ज्यामध्ये शिक्षेची तरतूद कमीत कमी पाच वर्षे आहे. तर एक कलम असे आहे ज्यामध्ये जामीन मिळत नाही. IPC च्या कलम ३५४ अ नुसार जास्तीत एक वर्ष शिक्षेची तरतूद आहे. तर ३५४ ड नुसार पाच वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे. दिल्ली पोलिसांकडे कोर्टाने या प्रकरणात सीडीआर रिपोर्ट आणि FSL रिपोर्ट दाखल करण्यास सांगितले होते. तसेच सुनावणी दरम्यान काही विदेशात राहणाऱ्या काही लोकांनाही नोटीस पाठवण्यात आली आहे. कोर्टाने इतर तपासासंदर्भातले जे अहवाल आहेत कोर्टात सादर करा, असेही स्पष्ट केले आहे

# राष्ट्रवादी आमचीच : प्रफुल्ल पटेल

आधुनिक केसरी न्यूज




**मुंबई :**राष्ट्रवादीची गुरूवारी झालेली बैठक ही अनधिकृत होती, त्या बैठकीला कोणताही अर्थ नाही, असा दावा खासदार प्रफुल्ल पटेल यांनी केला. काही लोकांकडून चुकीची माहिती पसरवली जात असून त्यामाध्यमातून संभ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. पक्षाचे बहुतांश आमदार आणि खासदार हे आपल्यासोबत असून पक्ष आपलाच असल्याचा दावा प्रफुल्ल पटेल यांनी केला. खासदार प्रफुल्ल पटेल म्हणाले की, खरी परिस्थिती तुम्हाला कळावी यासाठी आम्ही समोर आलो आहोत. 30 जूनला राष्ट्रवादीची महत्त्वाची बैठक झाली, त्यात अनेक लोक उपस्थित होते. बैठक देवगिरीवर झाली होती. अनेक आमदारही यावेळी उपस्थित होते, बहुतांश पदाधिकारी होते, कार्यकर्ते होते. त्यावेळी सर्वानुमते अजित पवारांना आपला नेता म्हणून घोषित करण्यात आले. त्यानंतर दोन-तीन गोष्टी करण्यात आल्या. त्यानंतर प्रफुल्ल पटेल यांना कार्यकारी अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले. विधानसभा अध्यक्षांना अजित पवार गटनेते आहेत असे सूचित करण्यात आले. अनिल पाटील प्रतोद असतील असंही सूचित करण्यात आले. विधानपरिषदेच्या सभापतींनाही अमोल मिटकरी हे परिषदेतील प्रतोद असतील असे सूचित करण्यात आले. त्याच दिवशी निवडणूक आयोगाला आमदार आणि सदस्यांच्या प्रतिज्ञापत्रांसह अर्ज देण्यात आला.

# नीलम गोऱ्हे यांचा ठाकरे गटाला जय महाराष्ट्र

## केंद्रातील व राज्यातील सरकारचे काम चांगले म्हणत घेतला निर्णय

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** विधान परिषदेच्या उपसभापती आणि ठाकरे गटाच्या महिला नेत्या नीलम गोऱ्हे यांनी आज शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे हा ठाकरे गटाला मोठा धक्का मानला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून नीलम गोऱ्हे शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. त्यावर आज अखेर पडदा पडला असून नीलम गोऱ्हेंनी ठाकरे गटाला रामराम ठोकत शिंदे गटात रीतसर प्रवेश केला आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित होते. यावेळी नीलम गोऱ्हे यांनी पक्षप्रवेशामागची आपली भूमिका स्पष्ट केली.

१९९२नंतर एनडीए आणि यूपीए अशा आघाड्या झाल्या. १९९८ साली मी शिवसेनेत प्रवेश केला. मला शिवसेनेत फार चांगले काम करता आले. सध्या निवडणूक आयोग व सर्वोच्च न्यायालयाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षच अधिकृत शिवसेना असल्याचा स्पष्ट निकाल दिला आहे. केंद्र सरकारने अनेक सकारात्मक पावले उचलली आहेत. नरेंद्र मोदी व अमित शाह यांची अनेक मुद्द्यांवर चांगली इच्छाशक्ती दिसत आहे. बाळासाहेब ठाकरेंच्या भूमिकांचा सन्मान करून केंद्रातील व राज्यातील सरकार काम करत आहे, अशा शब्दांत नीलम गोऱ्हेंनी केंद्र सरकार व राज्य सरकारचे कौतुक केले. दरम्यान, यावेळी आपण उपसभापतीपदी कायम राहून काम करत राहणार असल्याचे त्या म्हणाल्या.

मी उपसभापतीपदी असल्यामुळे त्या पदाच्या चौकटीत राहूनच मी काम करणार आहे, असे त्या म्हणाल्या. दरम्यान, सुषमा अंधारेंच्या शिवसेनेतील प्रवेशामुळे महिला आघाडीत नाराजी होती का? यासंदर्भात गेल्या काही महिन्यांपासून जोरदार चर्चा रंगली आहे. यावर नीलम गोऱ्हेंनी खोचक टिप्पणी केली. आमच्या पक्षात नाराजी वगैरे कुठेच नसते. नाराजी असली, तरी पक्षाचे नेते आले की सगळे नाराजी विसरत असतात. सटर-फटर लोकांमुळे नाराज होण्याची काही परिस्थिती नाहीये, असे नीलम गोऱ्हे यावेळी म्हणाल्या.

# सालगड्याने वाढदिवसाचा खर्च टाळून केले विद्यार्थ्यांस शालेय साहित्य वाटप

## सुभाष निहाळ यांचा उपक्रम; ग्रामस्थांकडून कौतुकाची थाप

आधुनिक केसरी न्यूज


**प्रा.बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** चनेगाव येथील दुसऱ्याच्या शेतात सालगडी म्हणून काम करणारे सुभाष निहाळ यांनी वाढदिवसानिमित्त होणाऱ्याअनाठायी खर्चाला फाटा देत त्याच पैशातून शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करून वाढदिवस साजरा केला. अल्पशिक्षित सालदाराने शाळा आणि विद्यार्थ्यांबद्दल आदर असल्याचे या उपक्रमातून दाखवून दिले.ग्रामस्थांकडून त्यांच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे. सुभाष निहाळ यांचा वाढदिवस नुकताच साजरा झाला. त्या निमित्ताने होणार अनाठायी खर्च टाळून पैशाचा उपयोग सामाजिक कार्यासाठी करायचा असे त्यांनी मनोमनी ठरवले होते. ही संकल्पना मित्रांना सांगितली.मित्रांनाही या सामाजिक उपक्रमांस होकार दिला. जन्मदिवशी गावातील जि.प.प्रा.शाळेतील २८५ विद्यार्थ्यांना मोफत वही, पेन्सिल, पेन यासारख्या शालेय वस्तूचे वाटप केले. वाढदिवसाचा अनाठायी खर्च सत्कारणी लागल्याचे समाधान निहाळ यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. सुभाष निहाळ हे अल्पभूधारक शेतकरी आहेत. घरच्या शेतीत कुटूंबाच्या गरजा भागत नाही म्हणून ते गावातील दुसऱ्याच्या शेतात सालगडी म्हणून काम करतात. यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो.त्यांचे शिक्षणही फारसे झाले नाही.ते अल्पशिक्षित आहेत.तरीही विद्यार्थ्यांविषयी त्यांच्या मनात आदर आहे. आपण जे कष्टाची कामे करतो अशी वेळ विद्यार्थ्यांवर येऊ नये अशी त्यांची भावना आहे.सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आपल्याला गावच्या शाळेविषयी अभिमान असल्याचे त्यांनी दाखवून दिले. कार्यक्रमास शाळा समिती अध्यक्ष जीवन घुगे, मा.सरपंच उद्धव जायभाये, शा. समिती सदस्य पुंजाराम निहाळ, सुभाष निहाळ, टायगर ग्रुपचे अध्यक्ष अशोक मुटकुळे, सदस्य निवृत्ती महाडिक, दीपक शेवाळे, गणेश घुगे, प्रल्हाद निहाळ, राहुल मुटकुळे, शाळेचे मुख्याध्यापक डोईफोडे सर, यादव सर, देशपांडे सर, चेके सर, सपकाळ मॅडम, जाधव मॅडम, चोबे मॅडम यांसह ग्रामस्थ व विध्यार्थी उपस्थित होते.



मागील तीन वर्षांपासून विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप करण्याचे काम ते करतात . त्यांचा टायगर ग्रुप या सामाजिक संघटनेतही सहभाग असतो .त्या माध्यमातून रक्तदान, वृक्षारोपण, आपत्कालीन मदत अशा सामाजिक उपक्रमांत ते सहभागी होतात .याहीवर्षी त्यांनी विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप केले .ग्रामस्थांकडून त्यांचे कौतूक होत आहे .निहाळ यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून गावातील तरुणांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान द्यावे असे मत शालेय समितीचे अध्यक्ष जीवन घुगे यांनी व्यक्त केले . यावेळी निहाळ यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




## संगीत देवबाभळी

आधुनिक केसरी

चित्रपटाच्या तुलनेत दृश्ये दाखवताना नाटकांना अनेक मर्यादा पडतात पण इथे त्या सगळ्या मर्यादा असूनही सगळं काही रंगमंचावर जिवंत करण्यात दिग्दर्शक, नेपथ्यकार आणि प्रकाश योजनाकार यशस्वी झाले आहेत. प्रेक्षकांना एक भव्यदिव्य अनुभव त्यांनी दिला आहे.
जगताना स्वतःसाठी काहीतरी जपून ठेव.'' प्रत्येकानं आपापल्या वाट्याचं शेत नांगरून ठेवायचं असतं. पाऊस पडेल किंवा नाही याची चिंता करायची नसते.' ही वाक्यं कुठेतरी गीतेतल्या उपदेशाशी नातं सांगणारी आहेत असं मला वाटतं. आपलं कर्तव्य आपण प्रामाणिकपणे करावं. बाकी गोष्टी आपल्या हातात नसतात. पुढचं ईश्वरावर सोपवावं असंच गीतेत सांगितलं आहे ना !
एकंदरीत हे नाटक आपल्याला थेट विठ्ठलाशी जोडणारा सांगीतिक अनुभव देतं. या नाटकात एकाच रंगमंचावर जणू देहू नगरी अवतरली आहे. तुकारामबुवांचा वाडा, आवलीच स्वयंपाकघर, भंडाऱ्याचा डोंगर, इंद्रायणीचा घाट हे सगळे दाखवण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला आहे. यात प्रकाश योजना, नेपथ्य या साऱ्यांचा भाग आहेच. आवली किंवा रुख्मिणी कपडे धुताना, इंद्रायणीच्या पाण्यात हात घातल्यानंतर होणारा आवाज इतका हुबेहूब आहे की खरोखरच इंद्रायणी नदी तिथे असल्याचा भास होतो. यात पारंपरिक संगीत वाद्यांचा वापर केला आहे. तबला, पखवाज, संवादिनी, सतार आदी वाद्यांचे स्वर मन प्रसन्न करणारे आहेत. प्राजक्त देशमुख यांचे संवाद आणि अभंगरचना यांना शुभांगी सदावर्ते ( आवली ) आणि मानसी जोशी ( रुख्मिणी /लखुबाई ) यांनी न्याय दिला आहे असे म्हणण्यापेक्षा त्याचे सोने केले आहे असे म्हणणे योग्य ठरेल. आनंद भाटे यांचे तुकाराम महाराजांच्या अभंगांचे पार्श्वगायन भक्तिरसाचा अनुभव देणारे आहे. शुभांगी सदावर्ते आणि मानसी जोशी यांचा जिवंत अभिनय हे नाटकाचं वैशिष्ट्य. आवली जेव्हा तुकारामांना साद घालते तेव्हा तिचे, ' आवो आवो ' हे शब्द अक्षरशः काळजाचं पाणी पाणी करतात एवढी ताकद, एवढी आर्तता त्या स्वरात आहे.



## आनंदी पहाट

## जगणे समजले तरच सुख कळते

आधुनिक केसरी

सुख हे भोगण्यापेक्षा समजण्यात अधिक" असते, ह्याची जाणीव सतत असणे जरुरीचे असते. अर्धा ग्लास रिकामा असल्याचे दुःख करत बसण्यापेक्षा अर्धा ग्लास भरलेला असल्याचे सुख का मानू नये ? प्रत्येकाची सुखाची व्याख्या निराळी असते. अर्थातच ती ज्याच्या त्याच्या अनुभूतीवर ठरत असते. कोण कशात सुख शोधेल ते सांगता येत नाही, समजूही शकत नाही. सुख म्हणजे नक्की काय असते ? हे ज्याने त्याने अनुभवल्या शिवाय कळू शकत नाही.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

लहान सहान गोष्टीतही सुख, शोधले तर सापडते. सुख म्हणजे काय असते तसे बघितले तर आपण दैनंदिन जीवनांत नेहमीच अनुभवत असतो. जसे खूप दिवसापासून हरवलेली एखादी अत्यंत आवडीची वस्तू अचानक सापडते तेंव्हा, ट्रॅफिक जॅममध्ये आपण फसलेले असतो तेव्हा शेजारच्या गाडीतले लहान मूल आपल्याकडे बघून गोड हसते तेंव्हा, आकाशात पूर्ण गोल चंद्र दिसतो तेंव्हा जे काही अंतर्मनाला होते ना त्यांतही अनोखे सुख सामावलेले असते. म्हणजेच सुख एखाद्या वास्तुसारखे दिसत नसले तरीही आपल्याला मिळालेल्या सुखाची अनुभूती आपल्या चेहेऱ्यावर दिसू लागते. कमी अधिक प्रमाणात सर्वांच्याच वाटेला कष्ट, दुःख येत असतात, परंतू त्यावेळी मन प्रसन्न, आनंदी ठेवले कि सुख आपोआप आपल्याला शोधत येते. मन प्रसन्न आणि आनंदी ठेवण्यासाठी दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचाराने करण्याची जरुरी असल्याचे आपण समजून घेतले पाहिजे. आपल्यापैकी प्रत्येकाची सुख आणि समाधान मिळवायची धडपड सदोदित सुरु असते. खरे तर सुख आणि समाधान ह्या दोन्ही इतकीच शांती महत्वाची असते. सुख शरीरासाठी, समाधान मनासाठी आणि शांती मात्र अंतरात्म्यासाठी मिळवायची असते. अनेकदा आपल्याकडून आपल्याच अंतरात्म्याच्या शांतीची आपल्याला जाणीव होत नाही, त्याचा विचारही मनाला स्पर्श करत नाही.



आधुनिक केसरी

### विधीचे विधान | ज्ञाना-तुका ||

नाद ब्रह्म नाम | अन्य नाही कोठे ||
अंतरी हा भेटे | ॐकारात ||१||
नाभी स्थानी वसे | ब्रह्मरूप त्याचे ||
परावाणी वाचे | प्रगटतो ||२||
निर्गुणाचे रूप | सगुण सांगते ||
संतवाणी गाते | अभंगात ||३||
पूर्व संचिताने | लाभतो हा छंद ||
दिंडीचा आनंद | तेचि ब्रह्म ||४||
नामावीन दुजे | नाही रे साधन ||
विधीचे विधान | ज्ञाना-तुका ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**प्रतिकूलं ह्यभक्तेभ्यो वचनं तव मातृके|**
**अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं**
**नमाम्यहम्|| ३७||**
**अभक्तांसाठी तुझे वचन प्रतिकूल असते.**
**अशा तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या**
**प्राप्तीसाठी नमन करतो.**


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**ज्ञान युक्त वर त्याग की, कथा सभी सद्ग्रन्थ । शोभे ज्ञान न त्याग विन, भक्ति दास बिनु पन्थ ।।५२।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम अध्याय) ०२/०१/५२ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** ज्ञानयुक्त असलेल्याच महान त्यागाची कथा सर्व सद्ग्रंथ सांगतात. त्यागाशिवाय ज्ञान सुशोभित होत नाही, जसे योग्य मार्गाशिवाय प्रभू भक्तांची भक्ती होत नाही, अर्थात ब्रह्मनिष्ठ सद्गुरूंच्या योग मार्गा द्वारेच परमेश्वराची भक्ती अनुरागी भक्त करतात. म्हणजेच जेव्हा परमेश्वराची भक्ती वैराग्ययुक्त होऊन केली जाते , तेंव्हाच ज्ञानाची पूर्णता होते. म्हणून या दोह्यात त्यागयुक्त, वैराग्य पूर्ण ज्ञानाची प्रशंसा केलेली आहे.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## स्थूलपंचमहाभूते

आधुनिक केसरी


ते कधीच नाश पावत नाही असा जेव्हा सगळ्या बाजूने विचार केला तर आपण म्हणू शकतो की आकाशचं शाश्वत ब्रम्ह आहे. यावर वकटा श्रोत्याला समजून सांगतो की, आकाश तमोगुणापासून निर्माण झाले. त्यामुळे कामक्रोध सारख्या विकार त्याच्याकडे आहेत. आकाश शुन्यमय आहे. ते अज्ञानमय असल्याने काम, क्रोध, लोभ, भय, ईर्शा, शोक, मोह हे विकार त्याच्याकडे असतात. आकाशाचा गुण अज्ञान व त्या अज्ञानाचे विवेचन आपण आता करूया. शुन्य ही निर्वात पोकळी आहे. जे नाही ते नाही म्हणून सांगणे म्हणजे शुन्य होय. कुणी कठोर मनोवृत्तीचा असतो तर कुणी बेशरम असतो सगळीकडे बेबनाव माजवतो त्यालाही आपण हृदयशुन्य असे म्हणतो. कुणाच्या मनात अजिबात दयामाया नसते कठोर मनोवृत्ती असते त्यालाही आपण शून्य असे म्हणतो. आकाशाचा स्तब्धपणा हा शून्यमय असतो. शून्य म्हणजे अज्ञान व हे अज्ञान म्हणजेच जडत्व होय. आकाश स्थूल व जड आहे. ब्रम्हाचा स्तब्धपणा चैतन्यमय आहे. ज्ञानमय व सुक्ष्म आहे. आकाशाचे गुण ब्रम्हाच्या अगदीच उलट असल्याने ब्रम्ह व आकाश एक होऊ शकत नाहीत. जड व शुन्य आणि विकारवंत आकाशाला सुक्ष्म, सद्रुप, निर्विकार ब्रम्हाची बरोबरी कशी होईल.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## देह हा देवाच्या प्राप्तीकरता आहे

आधुनिक केसरी

एकदा असे झाले, की एका साधूकडे चोरांनी चोरी केली. ते पळून जात असताना शिष्यांनी पाहिले, तेव्हा चोरांना धरून त्या शिष्यांनी खूप चोप दिला. हे त्यांचे करणे गुरूला समजले, तेव्हा त्या चोरांना आणून, गुरूने त्यांच्या अंगाला तेल वगैरे लावून स्नान घातले, आणि त्यांना पंचपक्वान्नांचे भोजन दिले. ' हे असे काय करता ? ' म्हणून शिष्यांनी गुरूला विचारले, तेव्हा त्याने शिष्यांना सांगितले की, " तुम्ही तरी काय करता ? सर्वचजण देवाच्या घरी चोरी करीत आहेत; कारण आपल्याला त्याने हा जो देह दिला तो देवाची प्राप्ती करून घेण्यासाठी म्हणून दिला, परंतु आपण ते न करता त्याच्यापासून विषय चोरतो आहोच की नाही ! म्हणून, विषयात आसक्ती न ठेवता आपण मनापासून देवाची भक्ती करावी. " आपण सर्वांनी ' मी भगवंताकरिता आहे ' असे मनाने समजावे. सर्व ठिकाणी भगवंतच भरलेला आहे अशी मनाची पक्की खात्री झाल्यावर, मग द्वैत आपोआप नाहीसे होऊन जी एकाग्रता साधते, तीच खरी



समाधी होय.संत काय करतात ? आपण चुकीची वाट चालत असताना, ' अरे, तू वाट चुकलास ' अशी जागृती आपल्याला देतात आणि खरा मार्ग दाखवितात. ते सदासर्वदा समाधिसुख भोगीत असतात, आणि नेहमी भगवंताविषयीच सांगत असतात. भगवंताच्या लीला पाहणाऱ्यांनाच खरा आनंद मिळतो. आपण एक दाणा शेतात पेरावा आणि त्याबद्दल हजार दाणे घ्यावे, ही भगवंताची लीला आहे. भगवंताच्या ठिकाणी जे जे आहे ते ते सर्व आपल्या ठिकाणी आहे. जसा मारुतीमध्ये देव-अंश होता, तसा तो आपल्यामध्येही आहे; त्याने तो फुलविला, आपण तो झाकून विझवून टाकला. मारुतीचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवावे. त्याचे ब्रह्मचर्य, भक्ती, दास्य आणि परोपकार करण्याची तऱ्हा या गोष्टी आपण शिकाव्यात. मारुती हा चिरंजीव आहे. ज्याची तशी भावना असेल त्याला अजूनही त्याचे दर्शन होईल. मारुतीला सर्व सृष्टी रामरूप दिसली. हेच खरे भक्तीचे फळ आहे. उपासक देहाला विसरला की उपास्यमूर्तीमध्ये त्याला जिवंतपणा अनुभवाला येऊ लागेल. ' माझ्या देवाला हे आवडेल का ? ' अशा भावनेने जगात वागावे. हाच सगुणोपासनेचा मुख्य हेतू आहे. भगवंत दाता आहे, तो माझ्या मागे आहे, तो माझे कल्याण करणारा आहे, ही जाणीव झाली की, जे मिळाले ते भगवंताच्या इच्छेने मिळाले ही भावना होऊन, आहे त्या परिस्थितीमध्ये समाधान मिळेल. समाधान आणि आनंद हीच खरी लक्ष्मी होय. आपली वृत्ती अशी असावी की, कुणाला आनंद पाहिजे असेल तर त्याने आपल्याकडे धाव घ्यावी. इतर संपत्ती कितीही दिली तरी पुरी पडत नाही, पण वृत्तीचा आनंद देऊन कधीच संपत नाही.

**आजचे बोधवचन आहे- वृत्तीचे समाधान ही भगवंताच्या कृपेची खूण आहे.**

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

**ज्ञानोबामाउली निवृत्तीनाथांचे शिष्य होते. अशी अगणित उदाहरणे आहेत. ज्ञानेश्वर, रामदास स्वामी सारखे सिद्ध अवतार झाले. पण त्याना देखील गुरू करावा लागला तर साक्षात दत्तगुरूंना तपस्येच्या काळात २४ जीव भेटले. त्यातल्या प्रत्येकात त्यांना काही गुण दिसला काहीतरी शिकण्यासारख दिसलं म्हणून त्यांनी ह्या २४ जीवांना गुरु मानले. दिक्षा गुरु एकच असतो पण शिक्षा गुरु अनेक असू शकतात. श्री अनुसया नंदन दतात्रेयांनी खालील २४ जणांना शिक्षा गुरु मानले आहे व त्या प्रत्येका बद्दल ते काय म्हणतात ते थोडक्यात असे.**
**(१) पृथ्वी :- पुष्कळ सहन करून सर्वांनाच सुख देणे, सर्वांप्रती सदभाव व सहनशीलता शिकलो. (२) वायू :- असंतोष व निसंगता शिकलो. (३) आकाश :- आत्मा आकाशा सारखा अनादी आणि अविनाशी आहे ईश्वर त्याच्या सारखा सर्व व्यापी आहे हे शिकलो**
**क्रमशः**


विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**चलत्येकेन पादेन तिष्ठत्यन्येन पण्डितः । नासमीक्ष्य परं स्थानं पूर्वमायतनं त्यजेत् ।।सरलार्थ - शहाणा माणूस एक पाऊल पुढे टाकतो आणि दुसरे पाऊल टाकायच्या आधी विचार करतो. (याचा अर्थ कोणीही) पुढच्या स्थानाची पूर्ण तपासणी केल्यावाचून पूर्वीचे स्थान सोडू नये. स्पष्टीकरण : जे दुसरे ठिकाण किंवा जो दुसरा व्यवसाय आपण स्वीकारणार आहोत, ते स्थान किंवा तो व्यवसाय आपल्याला अनुकूल आहे का प्रतिकूल आहे, त्याची पूर्ण चौकशी केल्यावाचून पहिल्या स्थानाचा किंवा व्यवसायाचा त्याग करणे इष्ट नव्हे. नाही तर हेही नाही अन् तेही नाही अशी अवस्था व्हायची.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, ८ जुलै २०२३





वर्तमान राजकारणाचे वैश्विक तत्वज्ञान पान ६





सत्तेची लालसा आणि राजकारणातील बेतालपणा पान ७


# येवला येथे शरद पवार फोडणार राज्यव्यापी दौऱ्याचा पहिला नारळ

## महेश तपासे : पवारांचे जंगी स्वागत करण्याची राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची आखणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर पहिल्यांदाच राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरद पवार उद्या ८ जुलैला नाशिकच्या येवला इथून राज्यव्यापी दौऱ्याचा पहिला नारळ फोडणार आहेत अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी माध्यमांना दिली.

राज्यातील सर्वच कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी शरद पवारसाहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला असून या वडीलरुपी नेत्याने महाराष्ट्राचा दौरा करावा हा आग्रह केला. त्यानुसार उद्या शनिवार दिनांक ८ जुलै रोजी नाशिक जिल्हयाचा दौरा जाहीर केला आहे. सकाळी ८ वाजता सिल्व्हर ओक या निवासस्थानावरुन शरद पवारसाहेब निघतील. शरद पवार यांचे ठाणे, भिवंडी, पडगा, शहापूर, इगतपुरी यामार्गावर राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते ठिकठिकाणी जोरदार स्वागत करणार आहेत, असेही महेश तपासे यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस ही कार्यकर्त्यांची आहे. त्याचे अध्यक्ष आदरणीय शरद पवारसाहेब आहेत. पदावर नुसती नियुक्ती जाहीर



करुन होत नसते तर त्यासाठी क्रियाशील सदस्यांची बैठक घ्यावी लागते त्यामध्ये ठराव घ्यावा लागतो. त्यानंतरच प्रदेशाध्यक्ष पदाची निवड होते. प्रफुल पटेल यांनी सुनील तटकरे यांची निवड केली ती स्वतः केली. त्यांची क्रियाशील सदस्यांची बैठक झाली नाही. आणि काल राष्ट्रवादी काँग्रेसची दिल्लीत वर्कींग कमिटीची बैठक झाली त्यामध्ये २४ प्रदेशाध्यक्षांनी शरद पवार यांना पाठिंबा दिला आहे. तसा ठरावही झाला आहे, असेही महेश तपासे म्हणाले.

देशपातळीवर अनेक नेत्यांनी शरद पवारसाहेब यांना पाठिंबा दिला आहे. स्वतः राहुल गांधी यांनी शरद पवार यांची भेट घेतली. आता बंगळुरूमध्ये होणाऱ्या विरोधी पक्षांच्या बैठकीला पवारसाहेब उपस्थित राहणार आहेत अशी माहितीही महेश तपासे यांनी दिली.

नियमबाह्य काय आहे हे जनता ठरवू दे त्यांनी सांगून काही होत नसते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पवारसाहेब आहेत. २४ राज्यामध्ये पक्षाचा विस्तार आहे. अनेक ठिकाणी निवडणूक लढवली आहे. महाराष्ट्रात काही आमदारांच्या सह्या घेऊन स्वतः ला राष्ट्रीय अध्यक्ष घोषित करु शकत नाही. केरळमध्ये आमदार आहेत तिथे सरकारमध्ये प्रतिनिधी आहेत. लक्षद्वीपमध्ये खासदार आहे. नागालँडमध्ये आमदार आहेत. या सर्वांनी शरद पवारसाहेबच राष्ट्रीय अध्यक्ष अशी घोषणा केली व तसा ठरावही केला आहे असेही महेश तपासे म्हणाले.

एकाच कुटुंबातील लोक एकत्र येत असतील तर आनंद आहे परंतु कुटुंब फोडण्याची परंपरा ही भाजपची आहे हे सर्वांना चांगलेच माहीत आहे असा टोला महेश तपासे यांनी दोन ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चेवर भाजपला लगावला.

# परळीत मोफत कृत्रिम हात व पाय शिबिराचे आयोजन

## गरजूंनी शिबिराचा लाभ घ्यावा : चंदुलाल बियाणी

आधुनिक केसरी न्यूज



**परळी :** राधा मोहन साथी प्रतिष्ठान व साधू वासवानी मिशन पुणे यांच्या वतीने रविवार दिनांक 16 जुलै रोजी परळी येथे दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत कृत्रिम हात व पाय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आर्टिफिशियल लिंब कॅम्प म्हणजेच कृत्रिम हात आणि पाय उपलब्ध करून दिले जाणार आहेत. हात व पाय नसल्यामुळे अनेक जणांना आपले जीवन जगताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. नवीन तंत्रज्ञानामुळे कृत्रिम हात व पाय बसवून पुन्हा एकदा जीवनात भरारी घेता येऊ शकते. गरजूंनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन राधा मोहन साथी प्रतिष्ठानचे अध्यक्ष चंदुलाल बियाणी यांनी केले आहे. रविवार दिनांक 16 जुलै रोजी सकाळी 9 ते दुपारी 1 या वेळेत औद्योगिक वसाहत नाथ रोड परळी येथे हे शिबिर होणार आहे. या शिबिरासाठी नाव नोंदणी आवश्यक असून दिव्यांगांनी आपली नाव नोंदणी ओमप्रकाश बुरांडे, प्रशांत जोशी, आनंद हाडबे, प्रकाश वर्मा, राजेश मोदानी, आनंद तूपसमुद्रे यांच्याकडे करावी, असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात येत आहे.



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना लोकमतचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार 'एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम अवॉर्ड' प्राप्त झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी सत्कार केला.

# लायन्स बार्शी रॉयलच्या अध्यक्षपदी राजेश खाडे; उद्या पदग्रहण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज



**बार्शी :** भारतासह अनेक देशांमध्ये सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या लायन्स क्लबच्या बार्शी रॉयल अध्यक्षपदी राजेश खाडे यांची निवड झाली आहे. तर सचिवपदी मनीष कथले, सहसचिवपदी नितीन आणवेकर, खजिनदारपदी शशिकांत बारबोले, सहखजिनदारपदी मनोज पाटील यांची निवड झाली आहे. रविवार, 9 जुलै रोजी सायंकाळी 6 वाजता मोरया फंक्शन हॉल समोर, शाळा क्र. 14 ताडसौंदणे रोड, सुभाष नगर, बार्शी येथे नवनिर्वाचित सदस्यांचा पदग्रहण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. या निवडीबद्दल मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन केले आहे. पदग्रहण सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.






|| नमो ||

शुभ कार्य तुमचे व्यवस्था आमची

विनोद मंडप डेकोरेटर्स अँड केटरर्स

लग्न, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, वास्तूशांती, शुभ कार्याच्या ऑर्डर स्वीकारल्या जातील.

प्रो.प्रा. विनोद जोगदंडे

9158500727, 8446185722

टाऊन हॉल, व्हीआयपी रोड, छत्रपती संभाजीगर


# सहकार खात्यात शेकडो जागा भरणार

आधुनिक केसरी न्यूज




**वर्धा :** राज्यभरातील सहकार खात्याच्या कार्यालयात विविध पदांसाठी सरळ सेवेने पद भरती केल्या जाणार आहे. इच्छुकांना ७ ते २१ जुलै दरम्यान अर्ज दाखल करता येईल.विभागीय सहनिबंधक, लेखा परीक्षक,सहकारी अधिकारी,वरिष्ठ लिपिक, लघु टंकलेखक अशी सुमारे ३०९ पदे भरल्या जाणार आहेत. नऊ विभागीय कार्यालयांच्या आस्थापनेत ही पदे आहेत.पात्र उमेदवारांनी सहकार आयुक्त यांच्या संकेतस्थळावर अर्ज सादर करायचा आहे.२१ जुलै नंतर ही लिंक बंद होणार.

भरती साठी ऑनलाईन परीक्षा महाराष्ट्रातील निश्चित केलेल्या केंद्रावर घेण्यात येईल.या परीक्षेची तारीख सहकार विभागाच्या संकेतस्थळावर नंतर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. संकेतस्थावरील वेळोवेळी प्रसारित करण्यात येणाऱ्या सूचनांची दखल घेवून कार्यवाही करण्याची दक्षता उमेदवारांनाच घ्यायची आहे.

# मोदींची टीका

आधुनिक केसरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्तीसगडची राजधानी रायपूर येथे शुक्रवारी एका जाहीर सभेत काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेसचा पंजा राज्याच्या विकासाच्या आड येत आहे. छत्तीसगडच्या विकासामध्ये काँग्रेसचा पंजा मोठ्या भिंतीप्रमाणे आडवा आला. या पंजाने राज्याच्या जनतेचे हक्क हिसकावून घेतले. या पंजानेच राज्याची लूट करून लोकांचे आयुष्य उद्ध्वस्त केले आहे. त्यांच्यासाठी छत्तीसगड हे केवळ एटीएम मशीनसारखे असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. रायपूर येथे विजय संकल्प महारॅलीला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या माध्यमातून एक प्रकारे आगामी विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. छत्तीसगडमध्ये काँग्रेसची सत्ता आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये राज्यात विधानसभा निवडणूक होण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने मोदी यांनी काँग्रेसवर अनेक आरोप केले. ते म्हणाले, “मागच्या निवडणुकीत काँग्रेसने राज्यातील जनतेला ३६ आश्वासने दिली होती. दारूबंदी करणे हे त्यापैकी एक आश्वासन होते. पाच वर्षे निघून गेले; पण दारूबंदी काही झाली नाही. उलट काँग्रेसने दारूच्या घोटाळ्यातून हजारो कोटींची कमाई केली आहे, याबद्दलचा सर्व तपशील वर्तमानपत्रांत छापून आलेला आहे.” छत्तीसगडच्या स्थापनेत भाजपाचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. राज्यातील जनतेच्या गरजा काय आहेत? हे भाजपाला चांगल्या प्रकारे माहीत आहे. आज आम्ही सात हजार कोटींहून अधिक किमतीच्या विविध प्रकल्पांचे भूमिपूजन या ठिकाणी करत आहोत, असेही ते पुढे म्हणाले. पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, “आता काँग्रेसचे लोक माझ्यावर हल्ला करतील. माझी कबर खोदण्याची धमकी देऊन, माझ्याविरोधात कटकारस्थान रचतील. पण, त्यांना माहीत नाही की, जो घाबरतो तो मोदी असू शकत नाही. काँग्रेस आता खोटी आश्वासने देऊन मागच्या पाच वर्षांतला भ्रष्टाचार आणि गैरकारभार लपवू पाहत आहे. तुम्हाला या खोट्या आश्वासनांपासून सावध राहण्याची आणि काळजी करण्याची आवश्यकता आहे. भाजपा हा एकमेव असा पक्ष आहे की, जो खरी आश्वासने देऊन ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतो. आपल्या नऊ वर्षांच्या पंतप्रधानपदाचा कार्यकाळ सांगत असताना मोदी म्हणाले, “मागच्या नऊ वर्षांच्या कार्यकाळात केंद्रातील भाजपा सरकारने छत्तीसगडमधील धान उत्पादकांना एक लाख कोटीहून अधिक रक्कम दिली आहे. या वर्षीही २२ कोटींहून अधिकची रक्कम धान उत्पादकांना मिळणार आहे. फक्त भाजपाच असा पक्ष आहे की , जो शेतकऱ्यांच्या मेहनतीची किंमत जाणून त्यांच्यासाठी काम करीत आहे. काँग्रेस पक्षाने मात्र नेहमीच शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे.

# नेते नाही पक्षाचे पोपट


विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी


**भारतात लोकशाही लागू झाली आणि देशाचा कारभार लोकांच्या हिता साठी लोकांच्या हाती आला. संविधानाने तळागाळातील, सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने मागास असलेल्या लोकांना सत्ता व संपती मध्ये महत्त्वाचे स्थान देऊन राष्ट्रहिताचे संविधान दिले. परंतु संविधान देताना दुसरीही बाजु मांडली ती म्हणजे संविधान कितीही चांगले असले तरी ते चालवणारे लोक चांगले नसतील तर संविधान कुचकामी ठरेल. ज्यांना संविधानाचा फायदा घेऊन खऱ्या अर्थाने देशाचा शासक बनायला पाहिजे तो वर्ग धार्मिक अंधश्रद्धा व धार्मिक चुकिच्या शिकवणीतुन बाहेर पडलाच नाही व संविधान, संविधानाने स्वतः चे दिलेला दिलेले हक्क अधिकार, संविधानाने मिळवून दिलेला मानसन्मान बहुसंख्य असलेल्या समाजाला समजलाच नाही.**

लोकशाहीमध्ये लोकप्रतीनिधी मार्फत जनकल्याण व राष्ट्रहित जोपासण्याची तरतूद संविधानायध्ये केलेली आहे. परंतु संविधान न कळाल्याने व मनामध्ये जनकल्याणाची भावना नसलेल्या लोकांना राजकीय पक्षात घेऊन लोकप्रतिनिधी म्हणून पक्षाने घोषित करून औपचारिक पणे जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी राजकारण समाज व देशाच्या विकासाची चाबी असताना त्या चाबिचा वापर वैयक्तिक स्वार्थासाठी करायला सुरवात केली. राजकारण हे सेवा भावनेतून करायचे असते परंतु त्यामध्ये लोकप्रतिनिधी यांनी व्यवसाय केला. लोकप्रतीनिधी झाल्यावर कामे सार्वजनिक कामे कमी आणि लोकप्रतिनिधी चे वैयक्तिक कामे जास्त जोमाने होऊ लागले व याला राजकीय क्षेत्रात पाहिजे तसा विरोध झाला नाही. याचाच अर्थ सर्व राजकीय नेते एकाच माळेचे मणी झाले आणि जनतेचा विकास न करता स्वतः च्या संपती वाढवण्यावर भर दिला. लोकप्रतीनिधी निवडून आला कि शेती, बँक, शाळा, महाविद्यालयात, हॉटेल, कारखाने, सोन्याचे दागदागिने, महागड्या गाड्या, मोठमोठे बंगले, महागड्या वस्तु या आपोआप त्यांच्या कडे येतात. लोकप्रतीनी झाल्यावर जनतेचा विकास होण्या ऐवजी स्वतः चाच विकास करून घेणारे नेते प्रामाणिक असतात असे म्हणणे म्हणजे बैल दूध देते यावर प्रचंड विश्वास ठेवणे होय. जनतेला लुटून करोडो रुपये कमवुन घ्यायचे आणि निवडणुकीत काम केले नाही म्हणून मत मिळायला पाहिजे म्हणून वाटायचे. निवडणुकीत मतासाठी वाटणारा पैसा नेमका येतो तरी कुठून ? आणि जो पैसा वाटून निवडणूक लढतो तो जनतेच्या हिताच्या कामे करणार कशासाठी ? हल्ली इव्हिएम ने तर मताची किंमतही शुन्य करून टाकली. वरिल बाबींचा विचार केला तर आपण ज्याला नेता समजतो नेता नसुन राजकारण व खुर्चीचा व्यवसाय करणारा व्यापारी आहे. आणि हा व्यापार व भ्रष्टाचार एवढा वाढला की एका पक्षाच्या सोबत राहून निवडून यायचे योग्य बोली व ईडीची भिती यामुळे लगेच सत्तेत सहभागी व्हायचे. आमदार खासदार जे इकडून तिकडे पळत आहेत ते जनतेसाठी नाही तर ते त्यांच्या स्वतः साठी पळत आहेत हे आता जनतेला कळून चुकले आहे. नेत्यांच्या पिढ्यानंपिढ्यांची कमाई होऊन त्यांचे मुलही आमदार खासदार होऊन त्यांचे करिअर ही झाले. सर्व सामान्य लोकांच्या हाताला काम नाही, शिक्षणाच्या व रोजगाराच्या सुविधा नाहीत, आरोग्य सुविधा मृतावस्थेत आहेत, महागाईने माणूस होरपळत आहे, तरुणांच्या हाती धर्माचा झेंडा देऊन गर्वाच्या दगडाने समाजात दुफळी व विषमता निर्माण केली जात आहे. महिला व सर्व सामान्य लोक सुरक्षित नाहीत. शुक्ला नावाचा नितीभ्रष्ट आदिवासी व्यक्तीवर मुततो, राष्ट्रपतीला मंदिर गाभाऱ्यात जाऊ दिले जात नाही. महिला खेळाडूंना न्याय मिळत नाही. या सर्व बाबींवर आवाज जनता उठवत आहे परंतु जनतेचे प्रतिनिधित्व करणारे प्रतिनिधी का बोलत नाही मुख्य प्रश्न आहे. ज्यांना आपण नेता वा प्रतिनिधी समजतो तो मुळात जनतेचा नाही जर तो जनतेचा असता तर त्याने जनतेच्या हिताचे काम करून सरकार ला प्रश्न विचारला असता. आजचे आमदार तर एखादे चुकिचे काम सरकार कडून होत असेल तर त्यामध्ये दुरुस्ती करायचा हल्ला देण्याची हिंमत करत नाही आणि सरकार ने घेतलेला चुकिचा निर्णय योग्य कसा आहे हे जनतेला पटवून देण्यासाठी आपली बुद्धी वापरतात. लोकप्रतिनिधी चे काम जनतेचा आवाज सरकार पर्यंत पोहचवण्याचा असतो सरकारचा आवाज जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम प्रतिनिधी चे नसते. एवढीही समज आज लोकप्रतिनीधींना राहली नाही. जनता किती ही समस्या ग्रस्त असेल तर जनतेचा प्रतिनिधी किंवा नेता हा जनतेच्या बाजुने बोलत नाही तो पक्षाच्या बाजूने बोलतो. कारण जनतेच्या बाजुने बोलले तर पक्ष श्रेष्ठींचा




अवमान होईल, पक्षश्रेष्ठी नाराज होतील, म्हणून जनतेचे प्रश्न वाढत गेले तरीही त्यांना काही सोयरसुतक नसते. जनतेच्या मताने निवडून आलेले लोकप्रतीनिधी यांनी कायम लोकांना नतमस्तक व्हायला पाहिजे तर निवडून आलेले लोक वयाने लहान असलेल्या परंतु पक्ष प्रमुखाच्या घरातील मुलांच्या पाया पडतात आणि सर्व सामान्य जनतेला मात्र वाऱ्यावर सोडून दोन शब्दही प्रेमाचे बोलत नाहीत. दोन वेळेस दोन गटातील आमदार सत्तेत सहभागी झाले. आमदार हे निवडून आल्यावर सार्वजनिक असतात. त्यांना सरकार मध्ये जायचे तर त्यांनी जनतेला विचारायला पाहिजे. परंतु तसे न करता मोरक्या म्हणाला म्हणून मोरक्या मागे जाणाऱ्यांना नेता म्हणत नसतात. जर लोकांना बिजेपीचे सरकार पाहिजे असते तर बिजेपीच्याच लोकांना जनतेने निवडून आणले नसते का ? बिजेपी नको म्हणून तुम्हाला निवडून दिले आणि तुम्ही पुन्हा तिकडेच गेले. बर तिकडे गेल्यावर जनतेचा काय फायदा ? संपती तर तुमची वाढली. काही लोकप्रतिनिधींना जनता सामाजिक समस्येवर प्रश्न विचारते तेव्हा कोणीच काही बोलत नाही. तुम्ही इकडून तिकडे का गेले तर तेव्हा त्यांचे उत्तर असते आमचा मोरक्या म्हणला म्हणून आम्ही आलो. मोरक्या तिकडे जाईल तिकडे आम्ही जाऊ. मग मोरक्या तिकडे जाईल तिकडे पळायचे असेल तर जनतेचे काय ? पक्षाने लिहुन दिलेली स्क्रिप्ट वाचने खुप सोपे आहे परंतु जनतेच्या प्रश्नांवर, शिक्षण, आरोग्य, रोजगार, महागाई, कृषी माल भाव, महिला अत्याचार, मागासवर्गीय अत्याचार यावर बोलण्यासाठी स्वतःची धमक लागते. आणि आज ती धमक केवळ ज्यांनी भ्रष्टाचार केला नाही आणि ज्यांना जनकल्याण करायचे तोच दाखवु शकतो. परंतु शोकांतिका आहे असा एकही प्रतिनिधी नाही जो स्पष्ट बोलून, सरकार ला ध्येय धोरणामध्ये दुरुस्ती करायला सांगुन जनतेचे काम करून देईल. परंतु पक्षाची व मोरक्या ची बाजु मांडुन आमचा मोरक्या कसा योग्य आहे हे पटवून देण्यासाठी चढाओढ लागलेली असते. परंतु आता जनताही जागृत झाली आहे. पळवापळवी, स्वार्थ, भ्रष्टाचाराचे राजकारण जनतेला ही कळत आहे. परंतु यामध्ये खुप मोठा धोका आहे तो म्हणजे संविधानाने ज्यांना शासक होण्याचा अधिकार दिला तो वर्ग शासक झाला नाही. लोकप्रतिनिधी केवळ लोकप्रतिनिधी च राहले त्यांना नेता होता आले नाही. नेता त्यांनाच म्हणले जाते जो सर्वांना सोबत घेऊन सामाजिक समस्या सोडवतो, विकासकामे शिक्षण रोजगार आरोग्य यावर काम करून कोणत्याही जातीचे धर्माचा आधार घेऊन स्वतः ला सुरक्षित करत नाही. जनतेच्या हिताविरोधात एखादी गोष्ट होत असेल तर त्याला विरोध करणारा व जनतेच्या हितासाठी आवश्यक काय आहे हे सरकारला पटवून देऊन ते काम करून घेणारा नेता असतो. पक्षांनी एखादे विधेयक मांडले किंवा एखादी योजना आणली केवळ आपण सरकार मध्ये आहोत आणि आपल्याच सरकारने हे सुरु केले म्हणून त्याचे गुणगान गायचे, दूसरी बाजू समजून न घेता जनतेला त्याचा खरचं फायदा होतो किंवा नाही, जनतेला त्यांची खरचं गरज आहे की नाही, किंवा ही योजना न देता दूसरी योजना दिली तर जनतेचा फायदा होईल असे मत मांडून जनतेच्या बाजुने बोलणारे लोकप्रतिनिधी इतिहासात जमा झाले आहे. आपल्या मोरक्या ने सांगितले तसच करायचे याला नेता नाही गुलाम म्हणतात. आणि जे लोक गुलाम आहेत ते लोक केवळ पक्षाची बाजु पोपटासारखी मांडतात कारण त्यांच्या मध्ये जनतेची बाजू मांडण्याची हिंमत नसते. केवळ सत्ता सत्तेमधुन आर्थिक मिळकत व राजकीय मानपान मिळवण्याच्या नादात गेल्या नऊ वर्षात जे काही काम झाले ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे तर झालेच परंतु ते काम नसते झाले तरीही जनतेवर काही परिणाम झाला नसता. उलट तोच पैसा शिक्षण नोकरी आरोग्य यासाठी खर्च झाला असता तर कितीतरी लोकांचे भविष्य उज्वल झाले असते. परंतु लोकप्रतीनिधींना लोकांची बाजु उचलून धरत नाहीत, करोडोचा घोटाळे केल्याने व त्यातून वाचण्यासाठी मोरक्या सांगेल तेच सत्य मानुन त्याच्या सोबत जाव लागते, त्याच्या बद्दल चांगले बोलावे लागते. असे काम करणाऱ्या लाचार लोकांना नेता कसं म्हणायचे म्हणजे हे पक्षाचे पोपट आहेत जनतेचे नेते नाहीत.

# गरज सरो वैद्य मरो, भारताच्या शेजारी राष्ट्रांची भूमिका


श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**शेजाऱ्यांशी प्रेमाने वागावे, शेजारी जेंव्हा संकटात असेल तेंव्हा त्यांना मदत करावी ही आपली संस्कृतीच आहे. याच संस्कृती नुसार भारताने आजवर आपल्या शेजारी असलेल्या सर्वच देशांना मदत केली आहे. जेंव्हा जेंव्हा हे शेजारी देश संकटात असतात तेंव्हा तेंव्हा भारताने या देशांना मदत केली आहे. शेजाऱ्यांचा मदतीला धावून जाणे ही भारताची परंपराच आहे मात्र हेच शेजारी देश जेंव्हा त्यांची गरज भागते तेंव्हा गरज सरो वैद्य मरो या म्हणी प्रमाणे भारताला विसरून चीनशी जवळीक करतात हे चित्र मागील काही वर्षात पाहायला मिळत आहे. आताही तेच चित्र पाहायला मिळत आहे. आता हेच पहा ना काही महिन्यांपूर्वी श्रीलंका हा भारताचा शेजारी असलेला देश अक्षरशः भिके कंगाल झाला होता.**

लोकांना एकवेळचे अन्न मिळत नव्हते देशात सर्वत्र अराजकता माजली होती. जनता रस्त्यांवर उतरून सत्ताधाऱ्यांना कपडे फाटेस्तोवर मारत होती. राजकीय नेत्यांची घरे जाळत होते. नेतेमंडळी देश सोडून पळत होते अशावेळी त्या देशात शांतता नांदावी, लोकांना पोटभर अन्न मिळावे, देशाला स्थिर सरकार मिळावे यासाठी भारतानेच पुढाकार घेतला. श्रीलंकेला या भीषण परिस्थितून बाहेर काढण्यासाठी भारताने ४ अरब डॉलरची मदत केली. भारताच्या मदतीमुळे हा देश सावरला. नवीन स्थिर सरकार स्थापन झाले. देशाला अराजकतेतून बाहेर काढणाऱ्या भारताचे तिथल्या सरकारने आभार मानायला हवे मात्र श्रीलंकेत आज सत्तेवर असलेल्या सरकारने भारताचे आभार मानायचे सोडून भारताचा शत्रू असलेल्या चीनशी जवळीक साधली आहे. ज्या चिमनुळेच श्रीलंका भिके कंगाल झाला त्याच चिनसोबत राहण्याचा निर्णय श्रीलंकेने घेतल्याने आश्चर्य वाटत आहे. श्रीलंकेचे विदेशमंत्री अलिसाबरी यांनी चीनच्या विदेशमंत्र्यांची नुकतीच भेट घेतली. या भेटीत दोन्ही देशात अनेक करार झाले. या बैठकीत बीआरसी प्रोजेक्टची यशस्विताही निश्चित करण्यात आली इतकेच नाही तर भारत आणि चीन यांच्यातील संबंधात श्रीलंका तटस्थ राहील अशी ग्वाहीही श्रीलंकेच्या विदेशमंत्र्यांनी चीनला दिली. ही सर्व चीड आणणारी बाब आहे कारण ज्या भारताने श्रीलंकेला संकटकाळात मदत केली त्यांच्या बाजूने उभे राहण्याचे सोडून ज्यांनी श्रीलंकेला भिके कंगाल केले त्याच चीनच्या बाजूने श्रीलंका उभी राहिली आहे. केवळ श्रीलंकाच नाही तर नेपाळ, बांगलादेश, भूतान, म्यानमार हे देशही छुपे रुस्तम आहेत. त्यांच्यावर संकट आले की ते भारताची मदत घेतात आणि संकट टळले की पुन्हा चीनचे तळवे चाटतात.



भारताचा सख्खा शेजारी आणि जगातील एकमेव हिंदू देश असलेला नेपाळने चीनच्या सांगण्यावरून भारताच्या लिलुपेक , लिंपुया धुरा या भागावर दावा करून भारताला दुखावले आहे. भुतानला भारताने संसद भवन बांधून दिले मात्र तेथील राजे कायम चीनच्या पाठीशी उभे राहिले आहेत. म्यानमारमध्ये लोकशाही नांदावी यासाठी भारताने अनेकदा प्रयत्न केले मात्र तेथील लष्करशाही चीनच्या पाठीशी उभी असते. बांगलादेशलाही भारताने अनेकदा मदत केली मात्र बांगलादेशचे सैनिक सीमेवर कायम भारतीय सैनिकांशी वाद घालत असतात. बांगलादेश रायफल आणि भारताच्या सीमा सुरक्षा दलाच्या सैनिकांमध्ये अधूनमधून गोळीबार होत असतो बांगलादेश मधून दररोज हजारो घुसखोर भारतात प्रवेश करत असतात. भारताने अनेकदा बांगलादेश सरकारकडे तक्रार करूनही ते त्याकडे दुर्लक्ष करतात. एकूणच भारताने संकट काळात मदत करूनही भारताचे शेजारी भारताशी गद्दारी करून चीनशी हातमिळवणी करतात त्यामुळे यापुढे या देशांना मदत करताना भारताने व्यवहारवादी भूमिका घ्यावी. जर हे देश भारताशी गद्दारी करून चीनला मदत करत करावी की नाही याबाबत भारताने गांभीर्याने विचार करावा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# रानडुकरांचा बंदोबस्त करा : शरद जोशी शेतकरी संघटनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील वानेगाव येथे 40 ते 50 रानडुकरांचा धुमाकूळ सुरू आहे त्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेच्या वतीने दिनांक 4 जूलै रोजी औरंगाबाद उपविभागीय अधिकारी व फुलंब्री चे तहसीलदार यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, तर या दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फुलंब्री तालुक्यातील वानेगाव येथे रानडुकरांचा धुमाकूळ सुरू आहे, हे रानडुकर शेतातील उभ्या पिकांचे अतोनात नुकसान करत आहे, त्यांना शेतकरी हाकालण्यासाठी गेले असता ते माणसाच्या अंगावर धावून येत आहे.

सध्या खरीप हंगामातील पिक पेरणी करण्यात आली आहे ती पिके रानडुकर उकरुन पिकांची नुकसान करत आहे.तसेच रात्री बेरात्री शेतकऱ्यांना शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी जावे लागत असल्याने त्या रानडुकरांपासुन शेतकऱ्यांना जीवाला धोका निर्माण झाला आहे.

काही ठिकाणी वानेगाव शिवारात शेतकरी महिला एकट्या असतात त्या सुद्धा घाबरून जात आहे.या रानडुकरांमुळे वानेगाव शिवारात दहशत निर्माण झाली आहे. सर्व शेतकरी परेशान झाले आहे, म्हणुन याकरिता या रानडुकरांचा बंदोबस्त लवकरात लवकर लावावे अशी मागणी शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे .

या प्रसंगी औरंगाबाद जिल्हाध्यक्ष काशीनाथ जाधव ,कारभारी जाधव , बाबुराव जाधव , सुभाष गायकवाड , किशोर निकम , अशोक शेळके यांच्या सह आदींची उपस्थिती होती.





# वंचित आघाडीने केले श्रमदान

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली लिंबाजी :** येथे या वर्षीचा पावसाला सुरूवात झाली असता चिंचोली लिंबाजी बस स्थानकावरील स्व. जोधाभैय्या जैस्वाल यांच्या गाळ्या समोर रस्तात फार मोठ खड्डा पडलेला आहे. त्या पडलेल्या खड्यात पाणी साचलेले होते. या खड्यातील तुंबलेल्या पाण्यामुळे खड्यांचा वाहन चालकांना अंदाज काढता येत नसल्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता होती. हे वंचित कार्यकर्ताच्या निर्देनाशत आले असता. वंचित कार्यकर्तानी श्रमदान करून. तुंबलेल्या खड्याच्या बाजुला खंदुन त्या रस्त्यावर तुंबलेले पाणी रस्तेच्या कडेला असलेली नाली मध्ये हे पाणी काढुन दिले.

या ठिकाणी श्रमदान करण्यासाठी वंचित कार्यकर्ते तातेराव भुजंग, अमृत चौघुले, मनोज बावस्कर, अशोक भुजंग व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी वंचित आघाडी तर्फे प्रशासनाला विनंती करण्यात आली. रस्तावर पडलेले खड्डे... तात्पुरते का होईना भरण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी जखमी; आंभोडा कदम येथील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** सध्या खरिपाच्या पेरणीच्या मोसम चालू आहे. त्यामुळे शेतकरी शेती कामात व्यस्त आहेत.असाच एक शेतकरी आपल्या कुटुंबासह शेती कामात व्यस्त असताना अचानक शेतकऱ्यावर रानडुकराने हल्ला चढवला.यामध्ये शेतकरी गंभीर जखमी झाला असून ग्रामस्थांच्या मदतीने जखमी शेतकऱ्यास जालना येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. भारत दत्तात्रय बोराडे असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. ही घटना मंठा तालुक्यातील आंभोडा कदम येथील शिवारात घडली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी भयभीत झाले असून वन विभागाने तात्काळ रानडुकरचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. सविस्तर माहिती अशी की आंभोडा कदम येथील शेतकरी भारत दत्तात्रय बोराडे (३८) हे नेहमी प्रमाणे आपल्या पत्नी सोबत शेतात गेले होते.दुपारी एकच्या सुमारास काही कुत्री रानडुकराचा पाठलाग करत होती.रानडुक्कर आपला जीव वाचवण्यासाठी वेगाने पुढे पळत होते.शेतकरी भारत बोराडे ज्या ठिकाणी काम करत होते त्याच दिशेने डुक्कर येत होते. रानडुक्कर अंगावर धावून येताच शेतकऱ्याने आपल्या हातातील कुऱ्हाडीने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला.परंतु तेवढ्यात डुकराने भारत बोराडे यांच्यावर हल्ला चढवला. डुकराने शेतकऱ्याच्या मांडीला चावा घेतल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होऊन शेतकरी गंभीर जखमी झाला. सुदैवाने जखमी शेतकऱ्याची पत्नी मीराबाई बोराडे ह्या या हल्ल्यातून बालबाल बचावल्या.परिसरातील शेतकऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत ग्रामस्थांच्या मदतीने जखमी अवस्थेतील शेतकऱ्यास मंठा येथील ग्रामीण रुग्णालयात हलवले.तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर जखमी शेतकरी भारत बोराडे यांस जालना येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

नातेवाईकाकडून मिळालेल्या माहितीनुसार शेतकऱ्यांची तब्येत स्थिर असून ती पूर्वपदावर येत असल्याचे म्हटले जात आहे.

अलीकडच्या काळात आंभोडा कदम शिवारात रानडुकराने हैदोस घातला आहे.त्यामुळे पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी होत असून शेतकऱ्यांस मोठे नुकसान सहन करावे लागत आहे.भरदिवसा मानवी वस्तीत रानडुकरे वावरताना दिसत असल्याने जीवाला धोकाही निर्माण झाला आहे. शेतकऱ्यास आपल्या कुटुंबासह लहान मुलांना सोबत घेऊन शेतात जावे लागते. परंतु रानडुकराने केलेल्या हल्ल्यामुळे परिसरात भीती पसरली आहे.वन विभागाने रानडुकराचा तात्काळ बंदोबस्त करून शासनाने जखमी शेतकऱ्यास आर्थिक मदत द्यावी अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# पिंपरीच्या अतिरिक्त आयुक्तपदी खोराटे

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांची बदली झाली आहे. त्यांच्या जागी मुख्याधिकारी संवर्गातील सोलापूर महापालिकेतील उपायुक्त विजयकुमार खोराटे यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश शासनाच्या उपसचिव प्रियंका कुलकर्णी-छापवाले यांनी प्रसृत केले आहेत. पिंपरी महापालिकेत अतिरिक्त आयुक्तांची तीन पदे आहेत. त्यातील दोन अतिरिक्त आयुक्त प्रतिनियुक्तीवरचे आणि महापालिका अधिकाऱ्यांकरिता पदोन्नतीसाठी एक अशी विभागणी आहे.

# पीक विमा १ रुपयांत; अर्ज भरण्यासाठी शंभराची नोट

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** पिक विमा भरण्यासाठी csc धारकांना फक्त 01 रुपयात पिक विमा भरता येतो पण शेतकऱ्यांकडून काही csc धारक जास्तीचे पैसे घेतात जास्त पैसे घेत असलेले csc धारकांची तक्रार करावी असे कृषी आयुक्तालयाने सांगितले आहे.

पीक विमा योजनेत सहभागाची नोंदणी करण्यासाठी सामुहिक सेवा केंद्र (CSC) धारकाला विमा कंपनीमार्फत प्रति अर्ज रक्कम रु.40/- देण्यात येते. तरीही तालुक्यात सर्वच ठिकाणी शेतकर्याकडुन जास्त पैशाची मागणी होत असल्याचे शेतकर्यातुन बोलले जाते. याबाबत काही सामुहिक सेवा केंद्र (CSC) धारकाकडून शेतक-यांकडून अतिरीक्त पैसे घेण्यात येत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होत




आहेत. त्या अनुषंगाने सर्व शेतक-यांस आवाहन करण्यात येते की, सामुहिक सेवा केंद्र (CSC) धारकाकडून केवळ रु.01/- रुपया भरुन पीक योजनेत सहभागाची नोंदणी करावी व CSC ने अतिरीक्त रक्कमेची मागणी केल्यास आपल्या संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, तहसिलदार / तालुका कृषि अधिकारी, जिल्हाधिकारी / जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयाशी यांचेशी संपर्क साधावा. आसे अवाहन कृषी आयुक्तांनी करुनही लुट चालुच आसल्याचे दिसते. बाबत जिल्हयातील सर्व सामुहिक सेवा केंद्र (CSC) धारकांना आपले स्तरावरुन सक्त सुचना देण्यात याव्यात व सामुहिक सेवा केंद्राची (CSC) नियमित तपासणी क्षेत्रीय अधिका-याकडून होईल याबाबतची कार्यवाही करावी. तसेच सोबत देण्यात येत असलेले प्रसिध्दिपत्रक सामुहिक सेवा केंद्र (CSC) धारकांना दर्शणीय भागात लावणेबाबतच्या सुचना देण्यात याव्यात. तरी देखील आज रोजी कुठल्याही सेवा केंद्रावर प्रसिद्धीपत्रक दिसुन येत नसल्याने पिक विमा १ रुपयात तर अर्ज भरण्यासाठी शंभराची नोट अशीच परीस्थिती सध्या पैठण तालुक्यात दिसते मात्रयाबाबत लेखी तक्रार मात्र शेतकरी करत नसल्याने csc धारकांचे शासणाच्या योजना आल्या कि दिवाळीच होते. याबाबत संबंधीत अधिकारी यांनी तालुक्यात तपासणी करावी अशी मागणी शेतकरी करत आहेत.




महाराष्ट्र Business Katta












# अंघोळ करणे अंगाशी आले ?



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**"बाळ, पावसाळ्याचे दिवस आहेत. नको जावू फिरायला. अन् तलावाकडे किंवा नदीकडे नकोसच जावू." एका आईची आपल्या बाळाला कणव. आई बाळावर प्रेम करते. मग ते बाळ कसेही असेना. आई आपल्या अनुभवातून बोलते. तिनं बरेच उन्हाळे पावसाळे पाहिलेले असतात. म्हणून ती बोलत असते. परंतु मुलं ऐकतील तेव्हा ना. मुलं मात्र स्वतःला शेरशहाच समजत असतात व तसेच वागत असतात. आईचं ते बोलणं. त्यावर तो मुलगा म्हणाला, अगं मला जावू दे ना. मी काय मरायला चाललो काय? ते बाळ बोलून गेलं. ते त्या बाळाचं शेवटचं बोलणं. ती एक सहल होती. तरुण मुलांनी आयोजीत केलेली. अलीकडं फिरायला जायचं फॅडच निर्माण झालंय. पैसे वाचविण्याऐवजी प्रत्येक माणसांचा पैसे उधळण्यात जीव. त्यातच कोणी वाईन, मांस घेवूनही फिरायला जात असतात. याही ठिकाणी तेच झालं.**

ही हृदयद्रावक घटना घडली नागपूरात. तब्बल पाच जण एका तलावात बुडून मरण पावले. काय गेलं त्यांचं. काहीच नाही. परंतु त्यांच्या पश्चात राहणारा तो परीवार किती शोकांकूल झाला असेल याची कल्पना न केलेली बरी. पाच जणांची प्रेतं जेव्हा त्या तलावातून बाहेर काढली. तेव्हा मात्र प्रत्येकच व्यक्ती गहिवरुन गेला होता. यातील दोन मुलं अशी होती की एकाला मायबापच नव्हते. तो आपल्या आजीजवळ राहात होता. त्याच्या घरी भरपूर मालमत्ता होती तर दुसरा एक असा होता की त्याचेही वडील पाचसहा वर्षापुर्वी मरण पावले होते. गत दोन महिण्यापुर्वीच त्याच्या लहान बहिणीचा विवाह झाला होता आणि आता तो व त्याची आई दोघंच घरात राहात होते. वडीलांचा पाच सहा वर्षापुर्वी आधार गेला, त्यावेळेस हाच मुलगा दहावीत होता. अतिशय लहान वय. त्यातच कमवता जीव गेल्यानं फार मोठं पहाड कोसळलं होतं त्या परीवारावर. तसं पाहता दोघंही भाऊबहीण अतिशय हुशार होते. दुर्दैव असं की आता शिकता येत नव्हतं. कारण त्यांच्या वडीलांच्या जाण्यानं घरावर फार मोठं संकट कोसळलं होतं. परंतु त्याच्या आईनं हिंमत सोडली नाही. ती परिस्थितीशी लढत राहिली. ती एका खाजगी कंपनीत लागली. ज्या ठिकाणी तिला फक्त अडीच हजार वेतन मिळायचं. काय करावं सुचायचं नाही. परंतु तेवढं अल्प वेतन मिळत असूनही तिनं आपल्या मुलांची शिक्षणाची आस पुर्ण केली. तिनं ऐपत नसतांनाही त्यांना शिकवलं. त्याच शिक्षणाच्या भरवशावर आज तो मुलगा एका खाजगी कंपनीत नोकरीला लागला होता. वेतन ब-यापैकी होतं.

वडीलांच्या मृत्यूला पाच सहा वर्ष झाले होते. आता मुलाला एका खाजगी कंपनीत जॉब लागल्यानं त्या मुलाची आर्थिक परिस्थिती सुधारली होती. अशातच त्यानं ठरवलं. आपल्या लहान बहिणीचा विवाह करायचा. तिला सुखी करायचं. मग आपलं पाहू. त्यानंतर त्यानं आपल्या बहिणीचा विवाह जोडला. त्यासाठी त्यानं एक लाख रुपये आपल्या नोकरीच्या भरवशावर कर्ज काढलं. मुलगाही ब-यापैकीच सापडला व तद्वतच त्यानं आपल्या बहिणीचा विवाह केला. त्या गोष्टीला आज दोन महिने झाले असतील.

आयुष्य........आयुष्याची काही निश्चीती नाही. ते काही शाश्वत नाही. कोणाला केव्हा मरण येईल ते काही सांगता येत नाही आणि कुठे येईल हेही सांगता येत नाही. म्हणतात की प्रत्येकाचा मृत्यू हा ठरलेलाच असतो. परंतु मृत्यू काही दोष आपल्यावर येवू देत नाही. म्हटलं आणि मानलं जातं की अमूक व्यक्ती ऐकला असता तर त्याला मरण आलं नसतं. परंतु तो मृत्यू ठरलेलाच असतो. कोणाला झोपेत येतो तर कोणाला बसता बसता. कोणी चालता चालता मरण पावतो तर कोणी कोणत्याही स्वरुपात. काही तर मृत्यू अनुभवतातही. ते स्वतः मृत्यूचं तांडव पाहतात. परंतु मरत नाहीत. अशीच एक दुधावरची मुलगी माळीणच्या भुस्खलनात मलब्यामधून तीन दिवसानंतर सापडली होती. तशीच एक प्रसिद्ध अभिनेत्री त्सुनामीच्या तडाख्यातून वाचली होती. तशीच ही घटना.

घटनेच्या दिवशी पाच जण फिरायला नागपूरात एका प्रसिद्ध तलावाच्या ठिकाणी गेले. पिकनीक मनवली. तशी सायंकाळ झाली व त्यांनी बेत आखला. आपण पार्टी मनवायची. ती पार्टी याच तलावाजवळ मनवायची. त्यातच त्यांनी नागपूरातीलच एका डॉक्टरला फोन केला व पार्टीचा उद्देशही सांगीतला व त्यालाही बोलावून घेतलं. तसा तो तिथं पोहोचताच थोडा अंधार पडायला लागला होता.

त्यांचा तो पार्टी करण्याचा बेत. कोणी म्हणतात की त्या पार्टीत काही जणांनी दारु प्राशन केली. त्यातच त्यातील एकजण म्हणाला,

"आपण अंघोळ करुया." परंतु त्या अंघोळीच्या उपद्व्यापावर बाकीच्यांनी नकार दिला. तोच तो मुलगा इतरांचे न ऐकता त्या तलावात अंघोळीसाठी गेला. तो अंघोळ करु लागला. त्यानंतर त्याची अंघोळ करणं बाकीचे पाहात होते. त्यांना तो मोह आवरला नाही. तसे बाकीचे उरलेले चारजण तिथं अंघोळीसाठी उतरले. कारण त्यांचा काळ हा आलाच होता. मात्र त्यातील एकजणाचं मरण आलं नव्हतं. तो अंघोळीसाठी गेलाच नाही.

ते पाचही जण. त्यांना पुरेसं पोहणं येत नव्हतं. तरीही ते अंघोळीसाठी पाण्यात उतरलेले. अशातच एकजण खोल पाण्यात गेला आणि आश्चर्याची गोष्ट ही की तो बुडायला लागला होता. म्हणतात की तो मुलगा बुडायला लागला होता. ते पाहून बाकीच्या चारमधून एकजण त्याला वाचवायला गेला. तशी दारु पोटात होतीच. त्यातच जो वाचवायला गेला, तोही बुडायला लागला. ते तिस-यांनं पाहिलं. त्यानंही तेच कृत्य केलं. अशाप्रकारचं कृत्य बाकीच्यांनीही केलं व तब्बल पाचही जण त्या तलावात बुडून मरण पावले.

ते सर्व मित्रच होते. जीवासाठी जीव देणारे जीवलग मित्र. त्यांनी आपल्या मित्रांना वाचविण्याच्या चक्करमध्ये मरण पत्करलं होतं. अशातच ते पाचही जण बुडत आहेत ही घटना गाडीजवळ उभा असलेला एक मित्र पाहात होता. त्यानं त्यावेळेस त्यानंतर



आरडाओरड केली व त्याच्या आरडाओरडीनंतर घटनास्थळी गावकरी व पोलिसताफा दाखल झाला. त्यानंतर शोधकार्य सुरु झालं व एकामागून एक अशी पाच प्रेते बाहेर काढली गेली. त्यात सर्व तरुण मुलं होती. कोणाचेच विवाह झालेले नव्हते.

आम्ही जन्म घेतो. आईवडील आम्हाला जन्म देतात. लहानाचे मोठे करतात. उन्हातून सावलीत नेतात. शिक्षण शिकवतात. लहान असतांना आम्ही आमच्या आईवडिलांच्या आज्ञेत वागतो. त्यांचं ऐकतो नव्हे तर ऐकावंच लागतं. कारण त्यांचा धाक असतो त्यावेळेस आमच्यावर. कधीकधी त्यांचा रागही येतो आम्हास. वाटतं की हे मायबाप उगाचंच आम्हाला काहीबाही बोलतात. परंतु त्यांचं बरोबर असतं. ते जे सांगतात, ते अनुभवातून बोलत असतात. परंतु आम्ही ऐकू तेव्हा ना. आम्ही आमच्या आईवडीलांचं ऐकत नाही. मोठे झालो की आम्ही स्वतःला फार हुशार झालो तेच समजतो. त्यातूनच अशाप्रकारच्या घटना घडतात.

या पाचपैकी त्या दोन मुलांची कहाणी. अगदी चित्रपटाला शोभेल अशी कहाणी आहे. अगदी त्या मुलाचा उमेदीचा काळ. संकटांचे दिवस निघून गेले होते आणि आता सुखमय जीवन येणार होते. अशातच ही दुर्घटना घडली. काय म्हणावं या घटनेला. नावच देता येत नाही. अगदी सुन्न करणारी घटना.

महत्वाचं सांगायचं म्हणजे बाळांनो, तुम्ही आपल्या आईवडीलांचे काळजीचे तुकडे आहात. जरा जपून पावलं टाका. काळ तुमचीच वाट पाहात आहे. ज्यांना आईवडील आहेत, त्यांचं ठीकच आहे. जर ते आपल्या आईवडिलांचं ऐकतील तर. तुम्ही आपल्या आईवडीलांचं ऐकाल तर तराल. नाहीतर समदा जन्म बेकार आहे.

ती घटना. त्या घटनेत अंघोळ करणे अंगाशी आले. जर आईचं त्या बाळानं कदाचीत ऐकलं असतं तर कदाचीत ही त्या मुलाच्या बाबतीत तरी अशी घटना घडली नसती. तसंच त्या मुलानं नकार देताच बाकीच्याही मुलांनी आपला बेत बदलविला असता. परंतु नाही. कोण ऐकणार आपल्या आईचं. आपणही आता मोठे झालो ना. आपण लहान थोडे ना राहिलो. आपल्याला सारं कळतं. अशाच आविर्भावात आपण वागत असतो. परंतु आपण जरी मोठे झालो असलो तरी आपल्या आईवडीलांपेक्षा मोठे नसतो. त्यांचा एकेक शब्द हा मोलाचा असतो. जो ऐकतो तोच तरतो. यात तसूभरही असत्यता नाही. परंतु कोण ऐकणार. कोणीच ऐकत नाही आजच्या काळात आपल्या आईवडिलांचं. उलट आपणच आपल्या आईवडीलांना उलट उत्तरे देवून मोकळे होतो.

विशेष सांगायचं म्हणजे आपली आई आपले वडील जे काही सांगतात. ते खरं असो की खोटं. त्यात फाटे फोडू नयेत. ते ऐकायलाच हवं. कारण त्या बोलण्यात काहीतरी अर्थ नक्कीच असतो हे निर्विवाद सत्य आहे.

# वर्तमान राजकारणाचे वैश्विक तत्त्वज्ञान



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**सत्ताच सत्तेचा बळी घेत असते. सिद्धार्थ गौतम बुद्धांनी "आवश्यकतेपेक्षा जी जी गोष्ट जास्त होते ती ती विष आहे" असे सांगितले. हे वैश्विक तत्वज्ञान 'पृथ्वी जिऑइड असून ती सूर्याभोवती फिरते एवढं नितळ, स्पष्ट आहे.' उन्हाळ्यात पावसाळा आला काय, अन पावसाळ्यात उन्हाळा आला काय; याचा परिवलन आणि परिभ्रमण क्रियेवर तिळमात्र परिणाम होत नसतो. तत्वज्ञानाचंही अगदी तसंच पक्क गणित आहे. यालाच नीती सुद्धा म्हटलं जातं. नीती आहे आणि त्यावरच जग चालंत असतं. तसं नसतं तर अनेकांच्या सत्ता अबाधित आणि चिरकाल राहिल्या असत्या, परंतु तसं होत नसतं. जसं दिसतं तसं नसतं. ते संपतच असतं. अनादी काळापासून जेंव्हा जेंव्हा अति झालं तेंव्हा तेंव्हा त्याची मातीच झाली. प्रचंड तपस्वी, प्रकांड पंडित, महाज्ञानी दशग्रंथी असलेल्या रावणाने नीती ओलांडली आणि पुढचा इतिहास आपल्या समोर आहे.**

भगवान श्रीकृष्णाच्या यादव कुळात सत्तेनं मर्यादा ओलांडल्या आणि यादवांनी यादवांना संपवलं! कंस काय अन औरंगजेब काय? सगळ्यांना नियतीच्या नियमांनी सोडलं नाही. एवढं लिहायचं कारण म्हणजे महाराष्ट्रात मागील काही काळापासून चालत असलेलं राजकारण आणि त्याचा सतत विचार करणारी महाराष्ट्राची बिचारी भोळी भाबडी जनता. परंतु जनता कधीच भोळी-भाबडी नसते! ई.स.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीपासूनच याचा प्रारंभ झाला. तिथेच या काळाला ग्रहण लागलं. भाजप-शिवसेना यांनी निवडणुका एकत्र लढल्या. केंद्रात भाजप चारशेपेक्षा जास्त जागा जिंकत त्यांचा घोडा सुसाट पाळायला लागला. त्यात महाराष्ट्रात युतीने बहुमताचा आकडा साधला, परंतु शिवसेना अडीच-अडीच वर्षाच्या मुख्यमंत्री पदावर अडून बसली. त्या दोघांचं दाराआड काय ठरलं होतं ते त्यांनाच माहित. भाजपा कुणालाच मोजायला तयार नव्हते आणि अजूनही नाहीत, ही (त्यांच्यासाठीच) धोक्याची घंटा आहे. मग सुरु झाली सत्तेसाठी सुंदोपसुंदी! "अडीच वर्षे शिवसेनेचाच मुख्यमंत्री होणार" म्हणत खा. संजय राऊत किल्ला लढवत होते. मध्येच सकाळी श्री अजितदादा पवार-श्री देवेंद्र फडणवीसांनी सरकार स्थापन करून लोकांना धक्का दिला. तिथे शरद पवार साहेबांनी आपले शिलेदार दाबून ठेवले आणि तीन दिवसांत सरकारचा गर्भपाताने दुसरा अंक संपला. दुसरीकडे चाणक्य पवार साहेबांनी नव्या खेळीने श्री उद्धव ठाकरे गळाला लावले आणि सुरु झाला सत्तेच्या सुंदोपसुंदीचा तिसरा अंक! त्यानंतर कोरोनाने ठाकरे सरकार काही काळ तरले.

कोरोना ओसरताच भाजपा केंद्रातून सक्रीय झाले.

सगळेच राजकारणी एकमेकांचा भ्रष्टाचार काढण्यात व्यस्त होते. यांना आपण का निवडून दिले (?) म्हणून सामान्य लोक मात्र प्रचंड त्रस्त होते. कुणीही मतदार राजाच्या मन-भावनेचा विचार केला नाही. यात विद्यमान मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे शिवसेना घेऊन पसार झाले. सत्तेच्या धुंदीत बुडा खालुन जवळपास चाळीस शिलेदार फुटून पसार होईपर्यंत तत्कालीन मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरेंना पत्ताच लागला नाही. 'राजा चूक करूच शकत नाही' अविर्भावात शिवसेना चालवणारे ठाकरेंनी भावनिक होत मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. भावनेचा आणि राजकारणाचा तिळमात्र संबंध नसतो हे ठाकरेंना कळलेच नाही! हा राजीनामा भाजप आणि शिंदे शिवसेना यांच्या पथ्यावर पडला. पुढील सूत्रे तात्काळ हलली आणि पुन्हा स्थापन झाले नवे युतीचे सरकार! त्यातही केंद्राने शिंदेंना मुख्यमंत्री आणि फडणवीसांना उपमुख्यमंत्री करून आश्चर्याचा आणखी एक धक्का दिला! एकानंतर एक भूकंप पाहून लोक अवाक होत राहिले. मध्येच एक सर्वोच्च न्यायालयाचा अंक येऊन गेला.

तिथेही निराशेपोटी अनेकांना पाण्यातले देव बाहेर काढावे लागले. सगळ्यात मोठा धक्का रविवारी बसला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नऊ आमदारांनी शिवसेना-भाजपच्या सरकारमध्ये सामील होत मंत्रीपदाची शपथ घेतली! अगोदर शिवसेना आणि आत्ता राष्ट्रवादी फुटली! कुणाला काहीच सुचत नव्हते! सामान्य मतदार माणूस अक्षरशः चक्रावून गेला. राष्ट्रवादी एकदमच सरकारमध्ये सामील झालेले पाहून लोकांनाच काय भाजपाच्या आमदार-खासदारांनी सुद्धा "हे खरं आहे का?" हे कळत नव्हते. महानुभावांनो, कोण किती चूक किती बरोबर? यात मी पडणार नाही. यातील मला केवळ वैश्विक तत्वज्ञान सांगायचे आहे.




सत्तेच्या अनुषंगाने जगाचा इतिहास मोठा विचित्र आहे. भारतीय राज्यघटना निर्माण करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील सर्वच घटनांचा बारकाईने अभ्यास करून घटना निर्माण केली. बाबासाहेब महान तत्त्वज्ञ-चिंतक होते. त्यांनी भारतीय राज्यघटनेत केवळ कलम, नियम केले नाहीत तर तिथे सर्वोच्च जीवनमुल्य अंतर्भूत केली. चारशे वर्षे गुलामीत काढलेल्या लोकांनी "मुल्याधीष्टीत भावना-स्वातंत्र्य जपावे ही अपेक्षा आणि आपण कितीही श्रीमंत-सत्ताधारी असलो तरी हे सगळं इथेच सोडून जायचे आहे" यासाठी देशातील नागरिक-सत्ताधारी लोकांना राज्यघटनेत मुल्ये-नीतीतत्वे आखून दिली. दुर्दैवाने अलीकडच्या चाळीस वर्षात सत्तेपायी या सर्वत्र नीती-मूल्यांची पायमल्ली झाली आणि तिथेच अधोगतीला प्रारंभ झाला. अबसोल्युट पावर करपट्स अब्सोल्यूटलीनुसार जसजशी सत्ता-शक्ती वाढते तशीतशी माणसाची नैतिकता कमीकमी होते. परिणामी आज माणसाची माणसाला किमत राहिली नाही. सगळेच एकमेकांच्या ऊर्जा कमजोर करत आहेत.

परिणामी देशाची सकारात्मक ऊर्जा क्षय पावत आहे. मानवता दुय्यम होऊन सत्ता-संपत्ती महत्वपूर्ण झाली. इथेच देश आणि माणसांची अधोगती सुरु झाली. सरकारे फोडणे, पाडणे सुरु झाले. लोकांवरचा नैतिकतेचा प्रभाव क्षीण झाला. गाव-घरापासून ते दिल्लीपर्यंत हा वणवा पसरला. त्यात प्रसार माध्यमे, मिडिया, इंटरनेट, मोबाईलने माणूस शून्य केला. माणसातील मूळ तत्वे रसातळाला गेली. गाव-घराघरांत माणसं एकमेकांवर कुरघोडी करताहेत. हेच वर्तन वरपर्यंत गेले. जीवन-तत्वांचा सगळा बट्ट्याबोळ झाला. अनेकांची हयात गेली, ते निवडून आले नाहीत, परंतु त्यांनी तत्व सोडले नाही. आजही लोक त्या माणसांची सन्मानाने नावे घेतात. परंतु नीती कुणाच्याही बापाला सोडत नाही आणि सोडणारही नाही. जे पेरले तेच उगवते. श्री उद्धव ठाकरेंनी सत्तेसाठी तडजोड केली, त्यांच्या पक्षाची मोडतोड झाली. पवार साहेबांनी अनेकांचा तोडा-फोडा केला आणि त्याची पुनरावृत्ती त्यांच्याच घरात झाली. एवढेच काय, आज खालपासून ते वरपर्यंत भाजपा सत्तेसाठी अनेक संकेत तुडवत आहे याची सुद्धा फळे त्यांना नक्की चाखावी लागतील यात तिळमात्र शंका नाही! राजकारणी धुरीनांनो आणि देशावाशियांनो, आपणास विनंती की; कृपया नीती-तत्वाचे राजकारण करून स्वतःसह देशातील गोरगरीब जनतेच्या कामाचा आणि त्यांच्या भावनांचा विचार करा. ज्या महान देशभक्तांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले याचे भान ठेवा.

सत्ता-संपत्ती आज आहे आणि उद्या नाही. तुमच्याकडे अब्जावधी रुपये पडून आहेत आणि आणखी कमावून काय करणार आहात? शेवटी लोकांच्या मनातून पडलेली माणसे निवडून येतील; पण तत्वाने आरशासमोर कधीच उभी राहू शकत नाहीत! तेव्हा, चला, सकारात्मक ऊर्जा पेरूया! आपण देशासाठी आहोत. देशहित सर्वोपरी मानून देश विकसित करूया. नागरिकांनी सुद्धा स्वार्थी, उर्जा नसलेल्या, भ्रष्ट लोकांविषयी चर्वितचर्वण न करता आपले जीवन उच्च विचारांनी समृद्ध करावे! नव्या दिशेला नवा सूर्योदय तुमची वाट पाहत आहे! जय जवान! जय किसान!

# सत्तेची लालसा आणि राजकारणातील बेतालपणा



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**काल ज्यांना शिव्या दिल्या आज त्यांचे गोडवे गाऊ काल ज्यांना दगड मारले आज त्यांच्या गळ्यात हार घालू......सत्तेसाठी सारेकाही....मुखवटा तो विकासाचे मुद्द्याचा सांगू.... गेल्या साडेतीन वर्षांपासून महाराष्ट्रात स्थापन होणारे सरकार निरनिराळ्या कारणांनी वादाच्या भोवऱ्यात सापडलेले आहे. साडेतीन वर्षांपूर्वी किमान समान कार्यक्रम या उद्देशाने महाआघाडीचे सरकार स्थापन झाले. तसे पाहिले तर हे सरकार किमान समान कार्यक्रमापेक्षा आपआपल्या पक्षाचा किमान विकास या दृष्टीने स्थापन झाले होते. त्याला कुठल्याही प्रकारची तत्त्व नव्हती. जो तो आपले तत्व आणि विचार वेगळे राखून सरकार स्थापले होते. त्यात प्रत्येकजण आपल्या पक्षाचे हित बघत होता. त्यातही अडीच वर्षाच्या काळात जास्तीत जास्त निधी राष्ट्रवादीला दिला जातो म्हणून शिवसेना आमदारांची नाराजी होती, अर्थ खात अजित पवारांन कडे होते.**

तशी सेनेच्या आमदारांची नाराजी वेळोवेळी प्रकट होत होती. उद्धव ठाकरे आपल्या आमदारांचे काही ऐकून घेत नाही असा सूर होता. मात्र त्याचवेळी मुख्यमंत्री अजित पवार हे सक्रिय होते मंत्रालयात बसत होते. त्यामुळे शिवसेना आमदारांमध्ये खदखद होती. परंतु जाणीव होऊनही उद्धव ठाकरे यांनी दुर्लक्ष केले आणि त्याचे रूपांतर एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडात झाले. दीड महिन्यानंतर एकनाथ शिंदे भाजपच्या सत्तेत सामील झाले, आणि मुख्यमंत्री झाले त्याचवेळी इकडे राष्ट्रवादीचे आमदारांनी भाजपमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला होता. परंतु शरद पवारांनी वेळ लावल्याने ते बारगळले आणि शिंदे यांना संधी मिळाली असाही गोप्या स्पोट प्रफुल्ल पटेल यांनी केला. जी परिस्थिती उद्धव ठाकरेंची झाली तीच परिस्थिती इकडे राष्ट्रवादीत आता शरद पवारांची झाली अजित पवार विरोधी पक्ष नेते पदाला कंटाळले होते आणि त्यांना संघटनेच्या संघटनात्मक कामात रस होता परंतु त्यांनी इच्छा व्यक्त करूनही बदल न झालेने शेवटी त्यांनीही बंड केले आणि भाजपा सरकार मध्ये सामील झाले.

जसे उद्धव ठाकरे म्हणाले की शिवसेनेच्या आमदारांनी हिम्मत करून मला सांगायला हवे होते की तुम्ही बाजूला व्हा मला मुख्यमंत्री व्हायचे मी बाजूला झालो असतो. तसेच जयंत पाटील म्हणाले की त्यांनी मला सांगायला हवे होते मी बाजूला झालो असतो परंतु हे शक्य नव्हते कारण शरद पवारांना अजित पवार मोठे होणे आवडत नव्हते.परवडणारे नव्हते. तीच खदखद अजित पवारांनी राष्ट्रवादीच्या बोलावलेल्या सभेत सांगितली आता वय झाले तर घरी बसा, आणि मार्गदर्शन करा आम्हाला आशीर्वाद द्या, नवीन पिढीला संधी द्या वगैरे वगैरे.. तर एकीकडे हे असे होणे यामागे शरद पवारच आहे अशी चर्चा जनमानसात सुरू आहे तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बोलून दाखवले आहे.

त्याचबरोबर ईडीचा ससेमीरा ईडीचा धाक सत्तेची लालसा या मुळेच अजित पवार राष्ट्रवादीने भाजपा सरकार मध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला.

हेही अजून अनाकल्य आहे कारण काल-परवापर्यंत ब्राह्मणांचे राजकारण, हिंदुत्व, आर.एस.एस, सावरकर, राम मंदिर, समान नागरी कायदा, हे सर्व राष्ट्रवादीला वर्ज

होते मग आताच त्यांनी भाजपची हात जोडणी करण्याचा हेतू काय ? तर त्यात त्याच्या दोन्ही गोष्टी साध्य होतात सत्तेमध्ये सहभाग घेऊन आपली कामे साध्य करून पक्षाची वाढ करणे आणि आपल्या मागे लागलेला ईडीचा ससेमीरा थांबवणे. कारण अजित पवारांनी बोलताना हे स्पष्ट केले की मी माझी तत्व सोडलेले नाही तर फक्त विकासाच्या मुद्द्यावर आम्ही एकत्र आलेलो आहे. थोडक्यात वर्षभराच्या काळात पक्षासाठी जे काही साध्य करता येईल आणि स्वतःसाठी साध्य करता येईल ते साध्य करून घ्यायचे आणि पक्ष मोठा करायचा. आणि तोपर्यंतच नरेंद्र मोदीं शिवाय देशाला पर्याय नाही अशी माळ जपायची.

कारण आतापर्यंतच्या काळात शरद पवार यांचा मोठे नेते म्हणून त्याचा नेहमी उल्लेख होतो पण त्यांना महाराष्ट्रात राष्ट्रवादीची एक हाती सत्ता आणणे साहेबांना कधीही जमले नाही हा एक पराभवच आहे म्हणूनच आता त्यांनी नव्यांना संधी द्यावी आणि बाजूला व्हावे असा या बदला मागचा हेतू त्याने स्पष्ट केला. शरद पवारांनी आतापर्यंतच्या राजकारणात वसंतदादांना धोका देऊन सरकार पाडले, शिवसेनेतून अनेक आमदारांन सह छगन भुजबळ यांना खेचले, उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री करून शिवसेना व त्याची होतीनव्हती अवस्था करून ठेवली बाळासाहेबांच्या विचारांशी कधी पटले नाही. अशा काँग्रेस ,राष्ट्रवादी मिळून महाआघाडी निर्माण केली. संजय राऊत यांना हाताशी धरून आपले विचार उद्धव ठाकरे यांच्या मनात रुजवले असेच म्हणावे लागेल. शेवटी शिवसेनेचे दोन तुकडे झाले आणि राष्ट्रवादीचे दोन तुकडे झाले .शरद पवारांनी जे पेरले ते त्यांच्या शेतात उगवले अर्थातच राष्ट्रवादी एक कलमी कार्यक्रम राबवल्यामुळे बाकी नाराज होतआहेत याचा विचार केला नाही अशा अनेक गोष्टी आता मनोमनी बिघडल्यामुळे बाहेर येत आहेत.येत राहतील. विचारांची दरी वाढत जाणार.

आता तर मंत्रिमंडळाचा विस्तार ही गोष्ट बाजूलाच राहिली. कारण राष्ट्रवादीच्या नवमंत्र्यांचा समावेश झाला त्यामुळेही शिवसेना शिंदे गट नाराजी प्रकट करू लागला आणि मुख्यमंत्र्यांना सगळ्यांना बोलून समजून घ्यावे लागले बच्चू कडू नाराज झाले. नंतर आलेल्यांना पण तीच पहिल्यांदा जेवायला मिळाले अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अशा अनेक गोष्टी शिंदे गटात घडतील त्यात नवल नाही पुन्हा महत्वाची खाते जातील ते वेगळेच. विधानसभेच्या सभापतीच्या निर्णयानंतर कदाचित एकनाथ शिंदे सह 16 आमदार अपात्र ठरतील असाही अंदाज व्यक्त केला जात आहे व ऑगस्टनंतर पावसाळी अधिवेशन नंतर अजित पवार मुख्यमंत्री होतील अशी ही शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे राजकारण काय कलाटणी घेत आहे हेच समजेना असे झाले आहे.१०५ आमदार असलेला पक्ष मात्र आपला युती धर्म निभावत आहे. 105 आमदारांना दहा मंत्री पद शिंदे गटाला दहा मंत्री पद राष्ट्रवादी अजित पवार गटाला नव मंत्रीपद.



सरकार स्थापनेसाठी झालेल्या तडजोडीमुळे शिंदे यांना मुख्यमंत्री पद द्यावे लागले आणि नाइलाजाने देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्री व्हावे लागले अर्थातच काही म्हटले तरी ती एक प्रकारची पदअवनतीच झाली आहे. अशा भाजपाच्या निर्णयामुळे कुठेतरी भाजपचे काँग्रेसीकरण होत तर नाही ना ? अशी शंका व्यक्त केली जात आहे. कारण हर्षवर्धन पाटील, राधाकृष्ण विखे पाटील, नारायण राणे, नितेश राणे, आणि अजून बरीचशी मंडळी भाजपात सामील झाली आहे. आता जर राष्ट्रवादीला तत्वाचा विचार न करताच दरवाजे उघडले आहेत कुठेतरी येणाऱ्या निवडणुकांमध्ये यामुळे नक्कीच भाजपाला कमी जागा निवडून येण्याण दुःख पचवाव लागेल. त्यामुळे त्यांनी आता सावधगिरी पाळणे आवश्यक आहे नाहीतर इतरांना स्वीकारण्यात आपण कुठेतरी काहीतरी गैर करतो आहे याचाही विचार त्यांनी करायला हवा आहे कारण शेवटी एकत्र राहून आपण सारे भाऊ भाऊ, आणि मिळून वाटून खाऊ असे जर झाले तर सत्ता आहे तोपर्यंत सर्वच पक्ष आपला फायदा करून घेऊन पक्षाची वाढ करेल, सरकारमध्ये सामील होण्याचे मुळे त्यांना अनेक फायदे प्राप्त होतील आणि ते कसे प्राप्त करून घ्यावे हे त्यांना चांगले जमते. महाराष्ट्रातले राजकारण आता एक वेगळेच वळण घेत आहे.पातळी घसरली आहे. येणाऱ्या त्याच्या पाठीशी अनेक घोटाळे आहेत सहकारातले घोटाळे, शिखर बँक घोटाळा, महाराष्ट्र सदन घोटाळा, सिंचन घोटाळा, साखर कारखाना प्रकरण आणि त्यामुळे जर ही मंडळी भ्रष्टाचार लपवण्यासाठी आणि त्यातून सुटका करून घेण्यासाठी जर आली असेल तर या गोष्टी विचारात घेऊन त्यांच्याशी युती करायला हवी कारण ती मंडळी त्यांची तत्व घेऊन आलेली आहेत. आम्ही त्यांची विचारधारा स्वीकारलेली नाही हे स्पष्ट केले आहे.

यातून अनेक गोष्टी पुढे आलेले आहे जसे की बाळासाहेबांना न चालणारे पक्ष आणि त्या पक्षाशी युती करून महाआघाडी करून सत्ता स्थापन करणे, मुख्यमंत्रीपद घेणे आणि त्याचा रिमोट मात्र दुसऱ्याकडे देणे हेही नसे थोडके. दुसरे आता विचारांशी फारकत असताना विकासाच्या मुद्द्यावर आम्ही एकत्र आलो असे म्हणत नरेन्द्र मोदींच्या प्रेमात पडणारे अजित पवार. केंद्रातून मोदी सरकार हटाव म्हणून सर्वपक्षीय बैठकीला हजर राहणारे शरद पवार आणि उद्धव ठाकरे अनेक वेळा भाजीपाशी हातमिळवणी करावी या निर्णयापर्यंत आलेले राष्ट्रवादी पण ऐनवेळी निर्णय फिरवणारे शरद पवार. अत्यंत जवळजवळचे समजले जाणारे भुजबळ, पटेल, तटकरे ,वळसे पाटील, पक्षात बंड करतात.आम्हाला निर्णय प्रक्रियेत घेत नाही. काही सांगत नाही.

योग्य वेळी निवृत्ती घेतली नाही तर त्याचा शरद पवार होतो अशीही चर्चा जनमानसात आहे तसेच सोशल मीडियावरही वाचायला मिळते ऐकायला मिळते आज राज्य अनेक प्रश्न आहेत अवकाळी पाऊस झाला, अजून नियमित पाऊस येत नाही, पेरण्या रखडले आहेत, झालेल्या मोडकळीस आलेल्या आहेत, गतवर्षीचा कापूस भाव नाही म्हणून शेतकऱ्याच्या घरात मोठ्या प्रमाणात पडून आहे, याविषयी निर्णय नाही. शेतकऱ्याच्या आत्महत्या थांबत नाही, महागाई वाढते आहे, स्त्रियांवरचे अत्याचार वाढत आहेत, या प्रश्नाकडेही लक्ष द्यायला हवे ते दिले जात नाही. या राजकीय खेळीमुळे राजकारण्यांचे लक्ष आहे ते त्यांच्याच खुर्च्या टिकवण्याच्या नादात आहेत. विकासासाठी एकत्र येतात तर या गोष्टीकडे लक्ष द्यायला हवे हे कोण सांगणार ? अजूनही बरेच दिवस यांचा पक्ष खरा, की आमचा पक्ष खरा हे चालूच राहणार आहे .वर्ष झाले आपण ते पाहत आहोत. पहिला अंक शिंदे ठाकरे गटाचा झाला आता दुसरा अंक शरद पवार अजित पवार गटाचा बघायला मिळेल.मतदान केल्याचे बद्दल मतदारांना राजकीय नाट्याची तिकीटे मिळतात ही स्थिती आहे.

खोके, बोके ,काय हॉटेल.. काय हवा... काय जेवण.. असले विनोद आता बंद व्हायला हवे आणि गांभीर्याने राज्याच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला हवे. ना खाऊंगा ना खाने दूंगा हे ठीक आहे ..स्वतःच्या बाबतीत मोदी म्हणू शकतील. पण बाकीच्यांचे काय ? त्याच्याकडे लक्ष द्यायला हवे ना. त्यासाठी लाचारीने सत्तेच्या लालसेपोटी येणाऱ्यांना आवर घालायला हवी.हेही महत्त्वाचे. राज्यातील सध्याचे गलिच्छ राजकारण लक्षात घेता पक्षांतरबंदी कायदा अधिक सक्षम करण्याची गरज आहे. एकाच्या घरी नांदायचं, दुसऱ्याचा मंगळसूत्र घालायचा, उखाणा तिसऱ्याचा घ्यायचा, आणि गर्भ मात्र चौथ्याचा वाढवायचा, अशी विचित्र परिस्थिती दुर्दैवाने महाराष्ट्राचे राजकारणात आहे. अशी स्पष्ट शब्दात प्रतिक्रिया विशेष सरकारी वकील एडवोकेट उज्वल निकम यांनी व्यक्त केलेली आहे.

# डोक्यावर कोरड्या दुष्काळाचे ढग!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**यंदाच्या हंगामात विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी बीज पेरले, परंतु ते पावसाच्या महिन्याभराच्या दडीमुळे उगवलेच नाही. आता तो दुबार पेरणीबद्दल विचार करू लागला आहे, हे साहजिकच आहे. प्रारंभी सतत तिन दिवस आलेल्या रिमझिम पावसाने शेती ओली झाली. त्यामुळे कृषक बंधू हरखून गेला आणि धान पळे भरले, पेरणी करण्याच्या कामी लागला. पेरणी पूर्ण होत नाही तर पावसाने कायमची दडी मारली. मातीखाली गेलेले धान्य पावसाच्या अभावाने अंकुरलेच नाही. काही दाणे अंकुरले मात्र ते अंकूर मातीच्या पापडीतच गुदमरून जळून गेले. आता मात्र शेतकऱ्यांच्या डोक्यावर दुबार पेरणीचे खूळ स्वार झाले. यंदा पाऊस पडला नाही तर कोरडा दुष्काळ पडू शकतो. स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत महाराष्ट्राने अनेक दुष्काळ पाहिले आहेत. पण या वर्षीच्या दुष्काळाने कहर केला आहे.**

**(मागील अंकावरून)** जगात सिंचनासाठी ठिबक सिंचनाचा वापर सुरू आहे. या पद्धतीत पिकाच्या मुळांना पाणी मिळते व तेवढे पाणी त्यांच्या विकासासाठी पुरेसे ठरते. जास्त पाणी दिले गेल्यास मुळांसाठी जी खेळती हवा पाहिजे असते ती त्यांना मिळत नाही, परिणामी पिक जोम पकडत नाही. शेवटी पाणी जास्त देवून नुकसान आपलेच झालेले दिसून येते. आज धान, ऊस, केळी, द्राक्षे या सारखी जास्त पाणी लागणारी पिके घेण्याचा हव्यास वाढत चालला आहे. ही पिके भूजलावरील एक मोठे संकट ठरत आहेत. सगळ्यात अडचणीची बाब ही आहे की ही पिके प्रामुख्याने वर्षा छायेत जे जिल्हे येतात त्यातच या पिकांचे प्राबल्य जास्त आहे. पडणारा पाऊस ५०० ते ७०० मीमी एवढा असून हा वर्षाछायेचा पट्टा उत्तरेत धुळे जिल्ह्यापासून सुरू होवून खाली सांगली जिल्ह्यापर्यंत पसरला आहे. संपूर्ण विदर्भ व कोकणपट्टी पाण्याचे बाबतीत समृद्ध असूनसुद्धा त्या प्रदेशात या पिकांनी व्याप्त जमीन तुलनात्मकदृष्ट्या कमी आहे. दुर्दैव एवढ्यावरच संपत नाही. याच पट्ट्यात कमीतकमी नवीन १००चे वर साखर कारखाने उघडण्यासाठी अर्ज प्रलंबित आहेत, असे कळते. याला लालसा म्हणावयाचे की बौद्धिक दिवाळखोरी म्हणावयाचे ? ऊस उत्पादन हा महाराष्ट्राच्या शेतीला लागलेला कर्करोग होय. शेती, राजकारण, आमदार वा खासदार पद, मंत्री मंडळात समावेश या सर्व गोष्टींची इतकी सरमिसळ होवून गेली आहे, की कशामुळे काय होत आहे ? हे समजतच नाही. साखर उद्योग हे एक बांडगूळ आपण पोसत आहोत. सरकार टिकवण्यासाठी या उद्योगाला जगविणे ही एक अपरिहार्यता होवून बसली आहे. या उद्योगाचे वैशिष्ट्य म्हणजे हा उद्योग तरूण होण्याचे आधीच म्हातारा झाला आहे. याला मदतीचे डोज दिल्याशिवाय हा जगणेच अशक्य होवून बसले आहे. कारखाने चालविणारे तेच, सरकारही त्यांचेच व या उद्योगाला मदत देणारेही तेच अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या सहकारी साखर कारखान्यांना आयकर लावण्यात यावा याबद्दल वारे वाहत आहेत, यामुळे तारांबळ उडाली आहे. पण लवकरच हा कर लावण्यात येवू नये, असा निर्णय झाल्याशिवाय राहणार नाही याबद्दल खात्री बाळगा. पाणी म्हणजे धान किंवा ऊस हे समीकरण महाराष्ट्राला घातक ठरणार आहे. महाराष्ट्रात उपलब्ध असणाऱ्या सिंचन सोयीपैकी ७५ टक्के सोयी एकाच पिकासाठी वापरणे इतर पिकांना अन्यायकारक ठरत आहे.

३ ) चुकीची पिक पद्धतीः सद्या आपण बहुविध पिक पद्धतीकडून एक पिक पद्धतीकडे मार्गक्रमण करीत आहोत. विदर्भात कापसासाठी, पश्चिम महाराष्ट्रात ऊसासाठी, खानदेशात केळीसाठी, नाशिक परिसरात द्राक्षासाठी शेतकरी वेडे झाले आहेत. त्या पिकात कोणत्याही कारणाने अपयश आल्यास, पिक बुडाल्यास, झालेला खर्च भरून न निघाल्यास, काढलेले कर्ज परतफेड करणे शक्य न झाल्यास येणारी निराशा शेतकऱ्याला आत्मघातापर्यंत घेवून जातांना दिसत आहे. विदर्भ खरे पाहिले असता हमखास पावसाचा पट्टा आहे. १००० मीमी पाऊस पडत असेल तर हेक्टरी एक कोटी लिटर्स पाणी शेतात असावयास हवे. इतके पाणी असल्यास आत्महत्या करण्याचा प्रसंग शेतकऱ्यावर का म्हणून यावा ? चुकीची पिक पद्धती यास कारणीभूत आहे, असे म्हंटल्यास वावगे ठरू नये. आज आपल्या देशात द्विदल धान्य, गळिताची धान्ये यांची नितांत गरज आहे. ही धान्ये आपण आयात करतो व त्यासाठी आपल्याला किंमती परदेशी चलन वाया घालवावे लागते. या पिकांना थोडे जरी पाणी दिले तर उत्पादनात भरमसाठ वाढ होते. सध्या या पिकांचे बाजार भावही चांगले आहेत. शेतकऱ्यांनी या पिकांकडेही प्राधान्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

शेती म्हणजे धान्य निर्मिती अशी चुकीची व्याख्या शेतकऱ्यांनी करून घेतली आहे. वन शेती, फल शेती, प्रथीन शेती यांच्याकडे त्यांचे लक्षच नाही. धान्याच्या भावात चढउतार फार असतात व त्यांचा फायदा शेतकऱ्यांना कधीच मिळत नाही. यासाठी शेतकऱ्यांनी आपले लक्ष या नवीन पिकांकडेही वळविणे गरजेचे आहे.

गहू हे महाराष्ट्राचे पिकच नव्हे. या पिकाला विकासाच्या वेळी जी थंडी आवश्यक असते ती महाराष्ट्रात अभावानेच आढळते. त्यामुळे शेतकऱ्यांनी या पिकाच्या नादाला न लागलेलेच बरे. महाराष्ट्रात कुरणे चांगल्या प्रकारे विकसित होवू शकतात. त्यामुळे दुधदुभत्याचा व्यवसाय या प्रदेशात अत्यंत उपयोगी ठरू शकतो. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी मनात आणले तर दुग्ध व्यवसाय या भागाला फारच किफायतशीर ठरू शकतो. आता थोडे ऊसाबद्दल. ऊसाला पाणी फार लागते. त्यामुळे आपण ऊसाचे ऐवजी बीटरूटची शेती केली तर आपल्या साखर उद्योग भरभरीत होवू शकतो. बीटचे पीक घेवून त्यानंतर दुसरे पिक पण घेतले जावू शकते. बीटाची काढणी करून ते कारखान्यापर्यंत नेण्यासाठी येणारा खर्चही तुलनात्मक दृष्ट्या कमी येतो. यावर अधिक संशोधन होणे आवश्यक आहे. ते झाल्यास आपल्या शेतकऱ्यांच्या फायद्याचे ठरू शकेल.

यंदाच्या हंगामात विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी बीज पेरले, परंतु ते पावसाच्या महिन्याभराच्या दडीमुळे उगवलेच नाही. आता तो दुबार पेरणीबद्दल विचार करू लागला आहे, हे साहजिकच आहे. प्रारंभी सतत तिन दिवस आलेल्या रिमझिम पावसाने शेती ओली झाली. त्यामुळे कृषक बंधू हरखून गेला आणि धान पळे भरले, पेरणी करण्याच्या कामी लागला. पेरणी पूर्ण होत नाही तर पावसाने कायमची दडी मारली. मातीखाली गेलेले धान्य पावसाच्या अभावाने अंकुरलेच नाही. काही दाणे अंकुरले मात्र ते अंकूर मातीच्या पापडीतच गुदमरून जळून गेले. आता मात्र शेतकऱ्यांच्या डोक्यावर दुबार पेरणीचे खूळ स्वार झाले. यंदा पाऊस पडला नाही तर कोरडा दुष्काळ पडू शकतो, म्हणून शेतकरी नेते मंडळी विदर्भास दुष्काळग्रस्त भाग घोषित करण्याच्या मागण्यांचे साकडे शासनाला घालत आहेत. आजही कडकडित उन्हाळा तापत आहे, त्यामुळे शासनाने जनतेकडे- अन्नदात्या शेतकरी बांधवांकडे सहानुभूतीच्या भावनेतून लक्ष देण्याची नितांत गरज भासत आहे. शेती हा व्यवसाय आहे. तो व्यवसाय म्हणूनच केला जावा. अल्पकालीन व दीर्घकालीन विकास योजना राबवून शेतीही शाश्वत व्यवसाय बनू शकतो ही बाब शेतकऱ्यांनी लक्षात ठेवावी.



# आ. मिटकरींनी बाबासाहेब आंबेडकरांचा संघविरोध कोणत्या पुस्तकात वाचला?

आधुनिक केसरी



अशोक राणे
संपर्क क्र. 9423658385

**राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष आपली निधर्मी वैचारिक मतभेद बाजूला सारून हिंदुत्ववादी भाजपा शिवसेना सरकारमध्ये सामील झाले आहेत. वास्तविक पाहता यापूर्वीच राष्ट्रवादी शिवसेना सोबत सरकारमध्ये सहभागी होऊन आपणास सत्तेसाठी कोणीच अस्पृश्य नसल्याचे दाखवून दिलेआहे. महाराष्ट्रात झालेल्या राजकीय बदलामुळे राजकीय वातावरण गढूळ होऊन कोण केव्हा कोणत्या पक्षात जाईल. याचा आता भरवसा राहिलेला नाही. राष्ट्रवादीचे आमदार सरकारमध्ये सामील होत असताना राष्ट्रवादीचे विधान परिषद सदस्य आमदार अमोल मिटकरी यांनी आपल्या पक्षाची निधर्मी विचारधारा दर्शविण्यासाठी भाजपावर हल्लाबोल करताना खोटी पोपटपंची केली आहे.**

भाजपाचे हिंदुत्व बेगडी आहे. आपण शिव-फुले-शाहू- आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते तत्वाशी तड़जोड करणार नसून मी संघाचा टोकाचा विरोधातआहोत. बाबासाहेब आंबेडकरही संघविरोधात होते असेवक्तव्य करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यपध्दतीवर तोंडसुख घेण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविक पाहता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रचंड साहित्य निर्माण केलेल असून देशातील तरुण त्यांचे साहित्य अभ्यासत आहेत. परंतु त्यांच्या साहित्यामध्ये संघविरोध दिसत नाही आणि असेल तर मिटकरी यांनी साहित्यामधील दाखला देऊन भाष्य करायला पाहिजे. महाड़च्या चवदार तळयाच्या आंदोलनपासून नागपुरमधील1956 च्या विजयादशमी धम्मचक्र परिवर्तनदिनपर्यंतच्या त्यांच्या प्रवासाकिंवा साहित्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला विरोध असल्याचा पुरावा नाही. तसेच त्यांच्या मुकनायक व बहिष्कृत भारत नियतकालिकमध्ये संघला विरोध असल्याचे एखादा अग्रलेख अथवा लेखन नाही. बाबासाहेब यांचे देशातील गाजलेल्या भाषणाचे संग्रहउपलब्ध आहेत आणि त्या संग्रहामध्ये संघविरोधात भाषणे नाहीत. मग मिटकरी यांनीबाबासाहेब यांच्या कोणत्या पुस्तकामध्ये संघविरोध वाचला आहे ? कोणत्या आधारावर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संघविरोधात होते असे खोटे वक्तव्य केले आहे ? यापूर्वी मिटकरी यांनी शिवकालीन इतिहासावर अनेक खोटे विधाने करून सवंग प्रसिद्धी मिळविली आहे. आतासुध्दा त्यांनी संघावर महापुरुषाचे खोटे दाखले देऊन टिकाटिप्पणीकरण्याचा कांगावा केलेला आहे. त्यांचा स्वतःचा संघकार्याला विरोध असू शकतो आणि त्यांनी तो खुशालपणे करावा. भारतीय संविधानाने दिलेला अधिकार आहे. परंतू खोटे बोलण्याचा अधिकार संविधानाने कोणालाही दिलेला नाही. हेसुद्धा लक्षात ठेवावे लागेल. तसेच अमोल मिटकरी म्हणतात मी संघाचा टोकाचा विरोधक आहे. परंतू त्यांच्यासंघविरोधाने संघकार्यावर काही फरक पडणार नाही एवढे मात्र निश्चित आहे. नेहरूपासून सोनिया गांधी यांनी तर संघविरोध नव्हे तर संघकार्य बंद करण्याचा चंग बांधलाहोता. श्रीमती इंदिरा गांधी यांनी तर देशात आणिबाणी लावून संघकार्यकर्त्यांना बंदीम्हणून कारागृहात बंदिस्त केले पण ते संघकार्याचे काहीच वाकड करू शकले नाही. संघविरोधी पालापाचोळा नेहमीच येत असतो आणि येऊन जातो पण संघकार्य अविरत चालू राहते हा अठ्ठयानऊ वर्षाचा संघाचा इतिहास आहे. अमोल मिटकरी यांच्या संघविरोध वक्तव्यमुळे संघकार्यात कोणता फरक पडणार आहे ? त्यामुळे मिटकरी यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबडेकर संघविरोधात होते कोणत्या पुस्तकामध्ये वाचले. कोणत्या अग्रलेखमध्ये वाचले. त्याचा दाखला द्यावा. हवेला लाथा मारण्याचा पराक्रम करू नये किंवा आमदार गोपीचंद पडळकर यांच्या भाषेत सांगायचे झाल्यास बाजारू विचारवंतांचा पाणचटपणासुद्धा करूनये. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वःता पुणे येथील संघशिबिरमध्ये भेटी दिल्या आहेत आणि संघकार्य जाणून घेतले होते. याचा अभ्यास अमोलमिटकरी यांनी करावा तसेच आतापर्यंत फुले-शाहू-आंबेडकर यांचा महाराष्ट्र असा गजर करणाऱ्या राष्ट्रवादीने अचानक "शिव"जोडून शिव-फुले-शाहू- आंबेडकर यांचा महाराष्ट्र असा बदल का केला आहे.



# तणावाला वाट मोकळी करुन दिली पाहिजे

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

**तणाव मनात साठवला तर त्याचा उद्रेक कधी होईल हे आपल्याला पण समजणार नाही म्हणून तणाव साठवण्या ऐवजी त्याला वाट मोकळी करुन देणं कधीही हितकारक ठरत. मानवी जीवन हे क्षणभंगुर आहे. पण शाश्वत जीवनात मोह माया, स्वार्थ मोह , भौतिक अशा अपेक्षा नसतात पण संसारीक भौतिक जीवनात मात्र अनेक अशा अपेक्षा मोह, स्वार्थ,अंहकार असल्याने दैनंदिन जीवनात अनेक तणतणावाचे प्रसंग निर्माण होतात.**

याच तणावाचे जीवनात व्यवस्थपान करण्यामध्ये आपण यशस्वी झालो तर मनात रागाचा संचय निर्माण होऊ शकत नाही हे वास्तविक सत्य आहे . सर्व साधारण पणे आपल्याला अधुन मधुन प्रचंड मोठ्या प्रमाणात अनावर होणारा राग येत असतो .तो येण स्वभाविक आहे आणि हा प्रचंड राग हा एकाएकी अथवा अचानक येत नाही. तर तो अनेक दिवसांपासून आपल्या मनात एक प्रकारचा वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने जो तणाव संचय निर्माण झालेला असतो त्याच तो उद्रेक असतो. वास्तविक पाहिलं तर जीवनात सुख दुःख हे समीकरण असतंच. आणि व्यक्ती कोणीही असो कर्म भोग हे कोणालाही चुकत नाहीत. त्यामुळे जीवनातील सुख दुःख यापासून स्वतः ची सुटका कोणालाही करून घेणं शक्य नाही तरी सुद्धा दैनंदिन अनेक विषयांच्या अनुषंगाने आपल्या मनात सकारात्मक आणि नकारात्मक भाव प्रकट होत असतात.

ते निर्माण होणं स्वाभाविक आहे.आपण ज्या विचारांना खतपाणी घालतो ते विचार आपल्यावर प्रभाव निर्माण होऊन तसे विचार निर्माण होत असतात .वारंवार निर्माण होणारे नकारात्मक विचारांचे तणावात रूपांतर होऊ देयचे नसेल तर आपण आपल्या मनातील तणावाला योग्य वेळी वाट मोकळी करुन देऊन मन मोकळं अथवा रिक्त केलं पाहिजे आणि ते गरजेचं आहे. असं केलं नाही तर मग हाळुहळु निर्माण होणाऱ्या या तणावाचे शेवटी प्रचंड अशा मोठ्या रागात रूपांतर होतं. म्हणजे राग हा कुठल्याही प्रकारचा असो एका क्षणात निर्माण होत नाही हे अगदी धुतल्या तांदळासारख स्वच्छ आणि वास्तव सत्य आहे.

एक एक टप्प्याने हळूहळू मनात राग संचाय होऊन तो आपलं रूप विस्तार करत असतो .आणि याच वेळी आपण नेमकं दुर्लक्ष करतो .आणि याचवेळी आपण हि परस्थिती ओळखु शकलो तर मग मात्र आपल खुप मोठा नुकसान टाळण्यात यशस्वी होतो. तसंच प्रचंड अशा येणाऱ्या मोठ्या रागा पासुन स्वतः ला वाचवु शकतो .रागाच व्यवस्थापन करण्यासाठी दैनंदिन नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे . आहार हा सात्विक असला पाहिजे, दैनंदिन व्यवस्थित संवाद , वाचन , अध्यात्मिक वाचनपण खुप महत्वपूर्ण आहे . तेव्हाच आपण दैनंदिन जीवनात अगदी तणाव मुक्त राहु शकतो . म्हणजे जीवनात येणारा प्रचंड राग आणि त्यामुळे होणार आपलं प्रचंड नुकसान थांबु शकत.व त्याचे आपल्या जीवनावरील विपरीत परिणामही आपण कुठं तरी नियंत्रित करू शकतो. म्हणून तणाव मुक्ति हि खूप आवश्यक आहे.

आणि आपण ती नक्कीच करू शकतो . त्यासाठी आपण कितीही व्यस्त असलो तरी दिवसभरात शरिरासाठी साधारणतः एका तसाचा वेळ आपण दिला पाहिजे. जेणेकरून निर्माण झालेला थोडा तणाव त्याच दिवशी संपुष्टात येईल . तसेच संवाद म्हणजे एक आठवड्याच्या दरम्यान आपल्याला मानसिक स्थैर्य देखिल मिळेल व स्थिर मन शांत होईल . संवाद देखिल खुप महत्वाचा आहे .मन तणाव मुक्त होईल असा संवाद देखिल झालाच पाहिजे. संवाद हे तणाव मुक्ति चे अगदी सुयोग्य साधन आहे .या साधनाचा योग्य लाभ आपल्याला घेता आला पाहिजे. आपण ज्या व्यक्तिशी संवाद साधल्या नंतर आपल्या मनाला हलकं वाटत बरं वाटत मन शांती मिळते .आशा व्यक्तिला अंहकार बाजुला ठेवून आवश्यकतेनुसार वैचारिक संवाद साधला पाहिजे .असे शब्द आपल्या कानावर पडताच क्षणी आपण तणावमुक्त झाल्यासारखे आपल्यला वाटत असतं .आणि त्यामुळे निर्माण होणारा तणाव त्याचे रागात होणार रुपांतर होण्या ऐवजी तो जगीच संपुष्टात येतो. दैनंदिन जीवनात वाचन मग ते काही पण वाचा पण वाचन आवश्यक आहे. वाचाल तर वाचाल हे उगीच म्हटलं नाही आणि त्यामध्ये हि अध्यात्मिक वाचन केले तर आति उत्तम आहे आणि या पद्धतीने आपण आपल्या जीवनात निर्माण होणारा शारिरिक मानसिक तणाव कमी करू शकतो आणि पर्यायाने त्याचे रागात होणार रुपांतर आपण नक्कीच थांबवु कतो. स्वतःचा बचाव करून आपण आपलं मोठं नुकसान टाळू शकतो. एक ज्ञानपूर्ण शांत स्थिर जीवन आपण जगू शकतो.

# प्रशासन व लोकसहभागाने जलयुक्त शिवार ठरले समृद्धी देणारे अभियान

आधुनिक केसरी

**शासनाच्या महत्त्वकांक्षी उपक्रमामध्ये जलयुक्त शिवार अभियानाचा समावेश आहे. औरंगाबाद जिल्ह्यात जलयुक्त शिवार पहिल्या टप्प्यात भरीव काम झाल्यामुळे त्याचा परिणाम शेतीची सुपीकता आणि भूजज पातळीत वाढ झाली आहे. जिल्ह्यतील उर्वरित गावात जलयुक्त शिवारा अभियानाचा टप्पा 2.0 अंतर्गत विविध कामे हाती घेतले असुन ती प्रगतीपथवार आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी आणि मृद संवर्धनासाठी तलावातील गाळ उपलब्ध झाला आहे. हे अभियान प्रशासन सामाजिक संस्था आणि महत्त्व पूर्ण असलेला ग्रामस्थांचा सहभागाने यशस्वी होत आहे.**

शासन निर्णय दिनांक 3 जानेवारी 2023 अनुसार जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. यात जिल्ह्यातील 119 गावांची निवड जलयुक्त शिवार अभियान 2.0 मध्ये 65 गावांचा समावेश प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत करण्यात आलेला आहे. यास ग्रामस्तरीय समितीच्या मान्यतेने तालुकास्तरीय समितीचे सदस्य केलेल्या 103 गाव आराखड्यास अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांनी परवानगी जिल्हास्तरीय समितीची मान्यता देण्यात आली.

कृषी विभाग, मृद व जलसंधारण विभाग, भूजल सर्वेक्षण, वन विभाग, जिल्हा परिषद, सिंचन विभाग अशा विविध विभागांचा समावेश असून ३ हजार २१५ क्षेत्रीय उपचार व जलसंधारणाची कामे करण्याचे नियोजित आहे. त्यापैकी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना( PMKSY 2.0 )अंतर्गत जिल्ह्यातील 65 गावांचा समावेश असून शेततळे व फळबागांची अशी एकूण 179 कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचप्रमाणे राज्य शासनाचे महत्त्वकांक्षी उपक्रम म्हणजे गाळमुक्त धरण व व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत जिल्ह्यातील 59 कामांना प्रशासकीय मान्यतेनंतर असून अशासकीय संस्थेच्या माध्यमातून 37 जलसाठ्यातील गाळ उपसा सुरू करण्यात आला आहे. यामध्ये माध्यमातून सुमारे २ लक्ष ९२ हजार २९३ घनमीटर इतका काळ उपसा करण्यात आलेला आहे.

मा.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जलयुक्त शिवार अभियानाच्या आढावा बैठकीत औरंगाबाद जिल्ह्याची प्रगती आघाडीवर असल्याचे सांगितले. उर्वरित कामासाठी मान्सूनचे आगमन लांबणीवर गेल्यामुळे इतर काम प्रगती पथवार आहेत. प्रधानमंत्री कृषी सिंचन विकास योजनेमध्ये जिल्ह्यतील यंत्रणाचे विभागप्रमुख, NGO अशासकीय संस्था, वसुंधरा पाणलोट कक्ष आणि लोकसहभागाने झोकून देऊन काम केले. उर्वरित मृद जलसंधारणाच्या कामात महसुल, कृषि आणि जलसंधारण विभाग काम करत असल्याने तसाच प्रतिसाद लोकसहभागाचा मिळाल्याने गती आली आहे. गावकऱ्याच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अंतर्गत शेतकऱ्यांनी शेत शिवारात 200 हेक्टर वर गाळ पसरवला आहे. त्याचा फायदा शेती उत्पादन आणि सुपीकतेत वाढ होऊन फायदा होत आहे. यामध्ये ग्रामस्थांचा व लोकप्रतिनिधीनी पणे उत्सफूर्त सहभाग नोंदवला.



जलयुक्त शिवारामध्ये जे गाव त्यांचा सहभाग नव्हता त्यांचा दुसऱ्या टप्प्यात सहभाग असणार आहे. जलयुक्त शिवारामुळे जमिनीतील भूजळ पातळीत वाढ झाल्याचा परिणाम दिसून आला आहे. मृद व जलसंधारणाची जिल्ह्यातील 9 ही तालुक्यातील दुरुस्तीची काम करण्यात आली. यामध्ये नाम, अनुलोम, बजाज BJS या अशासकीय संस्थानी पुढाकर घेतला. लोकसहभाग आणि प्रशासनाच्या समन्वयाने नाला खोलीकरण, रुंदीकरण शेतात पाणी साठे, शेततळे तयार करुन माथा ते पायथा पाणी माती संवर्धन करण्यात आले.

**डॉ. मीरा ढास, माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, औरंगाबाद**

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।




श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर
जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली,
शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

Walsekar Metal Private Limited
Manufacturer of Aluminium Alloy Cas ting
Address : K-58, MIDC AREA WALUJ, AURANGABAD-431136

# मोलखेडा परिसरात दमदार पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडासह परिसरात पावसाने दमदार हजेरी लावल्याने शेतकरी सुखावला आहे. मागील मृग नक्षत्र कोरडे गेल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी पावसाची वाट पाहत अखेर धूळपेरणी करून घेतली. मात्र, पाऊस काही येत नसल्यामुळे शेतकऱ्यांना आकाशाकडे पाहण्याची वेळ आली होती. दरम्यान बुधवारी सायंकाळी साडेपाच वाजेपासून पावसाला सुरुवात झाली. या दमदार पावसामुळे शेतकरी राजा सुखावला आहे. तसेच मागील काही दिवसांपासून उकाड्याने त्रस्त झालेले ग्रामस्थ या पावसामुळे सुखावले आहेत. पाऊस इतका जोरात होता की, हिवरी गावाकडे येथील रस्तेही जलमय झाले होते. रहदारीच्या मुख्य रस्त्यावर पाणीच पाणी वाहत होते. नाल्यांना पूर आला होता. काही शेतकऱ्यांच्या राहिलेल्या पेरणीलाही लवकरच सुरुवात होणार आहे. असे हि शेतकरी रामभाऊ वारंगणे व ग्रामपंचायत सदस्य अतुल इंगळे यांनी बोलताना सांगितले.मोलखेडा ते हिवरी गावाकडे जाणारा रस्तावर रोडवरील पाणी आल्यामुळे काही काळ रस्ता बंद झाला होता.अशी माहिती अतुल इंगळे यांनी दिली.



# सावळदबारा येथे नालीसफाईच्या कामाने घेतला वेग

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे भगवान चक्रधर स्वामींचे तिर्थक्षेत्र असून भाविक भक्त त्रस्त होत होते गावात येतानाच पहिले दर्शन प्रवेशद्वार जवळ साचलेल्या कचराचे होत होते म्हणून सरपंच सौ.शिवगंगा शिवाआप्पा चोपडे यांनी तातडीने दखल घेतली. गावातील नाल्यांमध्ये गाळ व कचरा साचून ते तुडुंब भरले होते. पावसाळा सुरुवर नाले स्वच्छ करणे आवश्यक होते. ग्रामस्थ यांनी ग्रामपंचायत कार्यालयात नाल्या साफ करण्यात याव्यात असे लेखी निवेदन देण्यात आले होते. याची दखल घेऊन सरपंचती शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो आरिफ मो. लुखमान व ग्रामसेवक सुधीर भालेराव यांनी मंजूर लावून गावातील नाल्या ह्या साफ करण्यात आल्या आहेत. तसेच कोरोना महामारीचे विषाणू हवेच्या माध्यमातून पसरण्याची शक्यता शास्त्रज्ञांनी वर्तविली आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने गावातील नाले स्वच्छ करुन सोडियम हायपोक्लोराईडची फवारणी करुन केशोरी-कनेरी हे गाव निर्जंतुक करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

यापूर्वी एकदा ग्रामपंचायतीने गावात निर्जंतुक माजी सरपंच स्वातीताई कोलते पाटील असताना फवारणी केली असून, त्याला एक वर्षाचा कालावधी लोटला आहे. विषाणूच्या संसर्गावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सोडियम हायपोक्लोराईडची फवारणी करुन गाव निर्जंतुक करावे, अशी मागणी आता शिवसेना महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ.अलकाबाई राजपूत व ग्रामस्थ यांनी केली आहे.



# गायरान जमिनीवरील घरे कायम करा

## वंचित बहुजन आघाडीची प्रशासनाकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यामध्ये नव्याने बदली होऊन आलेले तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी उद्धव कदम यांना वंचित बहुजन आघाडी तालुका उरण व भारतीय बौद्ध महासभा तालुका उरण तर्फे त्यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत व अभिनंदन करण्यात आले. वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौध्द महासभेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तहसीलदार उद्धव कदम यांच्या सोबत उरण भागातील महत्त्वाच्या विषयावर चर्चा केली . यावेळी उरण तालुका अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी तुकाराम खंडागळे, भारतीय बौद्ध महासभा उरण तालुका अध्यक्ष अमोल शेजवळ, उरण ता.संस्कार उपाध्यक्ष सदानंद सकपाळ,उरण शहर प्रमुख मुज्जमील तुंगेकर,कार्यकर्ते प्रभाकर जाधव व इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

उरण तालुक्यातील गायरान जमिनीवर समाजातील वंचित, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, भटके व विमुक्त गरीब व मागासवर्गीय लोकांनी वर्षानुवर्षे पक्की घरे बांधली आहेत. काहींना घरकुले मिळाली आहेत. सर्वांची ग्रामपंचायतीला नोंदी आहेत. केवळ महसूल नोंद नाही म्हणून अशा परिस्थितीत त्यांचे गायरान अतिक्रमण काढू नये ते नियमित व कायमस्वरूपी करण्यात यावे अशी मागणी तालुक्यातील शेकडो मागासवर्गीय लोकांसमवेत वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष तुकाराम खंडागळे यांनी तहसीलदारांकडे केली आहे.

समाजातील वाढती लोकसंख्या व गावात अपुरी घरजागा असल्याने त्यातच एका कुटुंबाची अनेक कुटुंबे झाल्याने व स्वतः ची जमीनही नसल्याने मागासवर्गीय लोकांनी गायराणात पक्की व शेडवजा घरे बांधली आहेत. भटके विमुक्त, मागासवर्गीय लोकांना काम केल्याशिवाय दोन वेळचे पोटाला मिळत नाही. त्यामुळे विस्थापित झालेल्या व परिस्थितीने असाह्य झालेल्या लोकांच्या घरांची अतिक्रमणे न काढता ती कायमस्वरूपी करण्यात यावीत अशी आग्रही मागणी तुकाराम खंडागळे यांनी तहसीलदार उद्धव कदम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.सदर गायरान जमिनीवरील घरे कायम करावी या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वामध्ये दि.20 जुलै 2023 रोजी विधानभवनावर मोर्चाचे आयोजन केले आहे. त्यामध्ये सर्व गायरान धाराकांनी मोठया संख्येने सामील व्हावे असे आवाहन तालुका अध्यक्ष तुकाराम खंडागळे यांच्याकडून करण्यात आले आहे.



# बुलढाणा अर्बनच्या सामाजिक उपक्रमामुळे गरजू कुटुंबीयांना आधार

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** सहकाराची समृद्ध परंपरा जतन करत सहकाराला सामाजिक उपक्रमांतर्गत बुलडाणा अर्बन परिवाराचे संस्थापक अध्यक्ष मा.( भाईजी ) राधेश्यामजी चांडक व चीफ मॅनिजिंग डायरेक्टर डॉ.सुकेशजी झंवर साहेब यांच्या कार्यतत्परतेमुळे कित्येक गरजू कुटुंबियाना आधार मिळत असल्याचे प्रतिपादन विभागीय व्यवस्थापक प्रफुल्ल संचेती यांनी केले. लोहा शहरातील बुलडाणा अर्बनच्या शाखेत मयत ठेवीदार वारसदार शिवराज सोनवळे यांना विमा संरक्षण रक्कम ४ लक्ष रुपये वाटप कार्यक्रम संपन्न झाला .यावेळी विभागीय व्यवस्थापक प्रफुल्ल संचेती म्हणाले की, बुलडाणा अर्बन नेहमीच ग्राहक, लघुउद्योजक व शेतकरी सभासदांच्या हितासाठी आर्थिक व सोशल बँकिंग राबवणारी आशिया खंडात सहकार क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणारी अग्रगण्य संस्था म्हणून ओळख निर्माण करणारी अग्रगण्य संस्था म्हणून ओळखली जात असल्याचे गौरवोद्गार काढले.तसेच बुलडाणा अर्बन नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवत पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षलागवड,गरजूंना धान्य वाटप,उच्च शिक्षणासाठी मदत, अपंग व्यक्तींना सहाय्य, बेवारस प्रेतांना त्यांच्या धर्माप्रमाणे अंत्यसंस्कार, रुग्णांना वेळेवर दवाखान्यात पोहचण्यासाठी अंबुलन्स सुविधा, अत्यल्प दरात कर्ज वाटप करून लोकांना सावकारी पाशातून मुक्त केले.कारागृहातील बंदी बांधवांना सुधारण्यासाठी संधी देण्याचे कार्य, वेअर हाऊस निर्मिती मुळे शेतकऱ्यांचे धान्य सुरक्षित ठेवण्यास मदत असे विविध उपक्रम बुलडाणा अर्बन च्या माध्यमातून देशभरात राबवले जात असल्याची अनेकांनी वेळोवेळी दखल घेऊन प्रशंसनीय उपक्रम राबवत असल्याबाबत अनेकांनी मत व्यक्त केले.

बुलडाणा अर्बन लोहा शाखेत बस्वराज शिवराज सोनवळे यांचे मुदत ठेव रक्कम रु.४ लक्ष होते. परंतु त्यांचा टिप्पर अपघातात दि.०४ मे २०२२ रोजी दुर्दैवी मृत्यू झाला. संस्थेच्या वतीने सभासदांच्या ठेवीला विमा संरक्षण देण्यात आले. सदर घटनेची माहिती मिळताच विभागीय व्यवस्थापक प्रफुल्ल संचेती यांच्या मार्गदर्शनानुसार शाखा व्यवस्थापक रमेश गव्हाणे व केशवराव शेटे यांनी परिवाराचे सांत्वन करून सदर अपघात विमा संदर्भात माहिती दिली व कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यात आला व तो मंजुरही झाला. यावेळी बुलडाणा अर्बन शाखा व्यवस्थापक रमेश गव्हाणे, शाखा व्यवस्थापक केशवराव शेटे, राजु जैन, ओमप्रकाश सोनवळे, प्रवीण कदम,ऋषिकेश खरात, दत्ता दागटे, चंद्रकांत मुंडकर व सदाशिव गायकवाड, आदि उपस्थित होते.

# उसाचे पेमेंट त्वरित करा: अन्यथा आंदोलन

## शेतकरी भागचंद लोढे पाटील यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याने फेब्रुवारी -मार्च २०२३ मध्ये गाळपासाठी आलेल्या उसाचे पेमेंट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले नसल्याने येत्या आठ दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यात पेमेंट जमा करावे अन्यथा शेवगाव नेवासा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने न्यायालयात दाद मागण्याचा तसेच कारखाना प्रवेशद्वारावर आंदोलन करण्याचा इशारा मजलेशहरचे ऊस उत्पादक शेतकरी भागचंद लोढे पाटील यांनी दिला आहे.

ज्ञानेश्वर कारखान्याचे अध्यक्ष असलेल्या घुले बंधूंचे जावयाचे ताब्यात असलेल्या कोपरगाव सहकारी साखर कारखान्याने आठ दिवसापूर्वीच २ हजार ५०० रुपयांनी पहिले पेमेंट केले आहे तर दोनशे पंचवीस रुपयांनी दुसरे हप्त्याचे पेमेंट आठ दिवसांपूर्वीच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमाही केले मात्र ज्ञानेश्वर सहकारी कारखान्याने मोठ्या प्रमाणात विक्रमी गाळप केले असतानाही केवळ मात्र राजकीय आकांक्षेपोटीच सर्वसामान्य शेतकऱ्यांना वेठीस धरुन शेतकऱ्यांची आर्थिक अडवणूक करण्यासाठी उसाचे अद्यापही पेमेंट केले नाही तसेच कामगारांचे तर पगारही वेळेवर होत नाही ऊस तोडणी कामगार व ऊस वाहतूक ठेकेदार यांच्याही कामाचे व कमिशनचे पेमेंट केले नसल्याने ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याने आठ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करावेत अन्यथा कारखान्याचे प्रवेशद्वारावर शेतकरी आंदोलन करतील असे भागचंद लोढे पाटील यांनी सांगितले.

# मेणबत्ती प्रज्वलित करणे ही भारतीय संस्कृती आहे, मेणबत्ती विझविणे नव्हे

## मठाधिपती रामगिरी महाराज

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** वाढदिवस साजरा करतांना प्रज्वलित केलेल्या मेणबत्त्या विझविणे म्हणजे भावी जीवनात अंधाराला म्हणजे दु:खाना पाचारण करणे होय. भारतीय संस्कृती मेणबत्त्या विझविणारी संस्कृती नव्हे तर मेणबत्त्या प्रज्वलित करून जीवनातील अंधार दूर करून जीवन सुखमय, आनंदमयव निरोगी करणारी संस्कृती होय, असे अमृत वचन सरला बेटच्या गोदाधामचे मठाधिपती ह.भ.प.रामगिरीजी महाराज यांनी शुक्रवारी लक्ष्मीनारायण लॉन्स येथील तालुक्यातील देशाच्या सरहद्दीवर कार्यरत वीर जवानांच्या जन्म दात्या माता-पित्यांच्या सन्मान व कृतज्ञता सोहळ्यात केले. निमीत्त होते एकनाथराव जाधव यांच्या जन्म दिनाचे. जाधव यांनी आपल्या जन्मदिनाच्या लाखो रुपयांच्या खर्चाला फाटा मारून सीमेवर कार्यरत २५०जवानांच्या आई- वडिलांचा गौरव व कृतज्ञता सोहळा आयोजित करून त्यांना सन्मान पत्र, साडी चोळी व शर्ट कापड, टोपी महंत रामगिरी महाराजांच्या हस्ते प्रदान केली. महाराज पुढे म्हणाले की, भारतीय संस्कृती "तंमत्सो माँ ज्योतिर्गमय" आहे, अंधारातून प्रकाशाकडे नेणारी आहे, अज्ञातून-ज्ञानाकडे नेणारी आहे, असे असताना पेटलेल्या मेणबत्त्या विझवणे कितपय योग्य ? श्री जाधव यांनी जन्म दिवसाचा सारा खर्च जवानांच्या आई वडिलांचा सन्मान व कृतज्ञता सोहळा करण्यात खर्च करून समाजाला योग्य दिशा दाखविली. त्यांची ही कृती योग्य वेळी योग्य सुचलेली ही योग्य कर्तृत्वची झलक होय, असेही महाराज पुढे म्हणाले, कार्यक्रमाचे सूत्र संचलन सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. प्रास्ताविक एकनाथ जाधव यांनी तर आभार कल्याण दांगोडे यांनी केले.

या समयी डॉ. दिनेश परदेशी, संजय निकम, मधूकर वालतुरे, ज्ञानेश्वर जगताप, कैलास पवार, दिनेश राजपूत, गणेश खैरे, दशरथ बनकर, महेश भालेराव, सुरेश राऊत, सौ. हर्षदा जाधव, सौ.आनंदी अन्नदाते, गौतम गायकवाड, शिवनाथ राहणे, अरविंद गायकवाड, रतीलाल गायकवाड, डॉ. सुभाष भोपळे, डॉ, गणेश अग्रवाल यांच्या सह ग्रामीण भागातील हजार बंधू-भगिनी उप स्थित होते.

# शेतकऱ्यावर खुनी हल्ला; एक ठार, एकावर उपचार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** ५जुलै रोजी रात्री १०च्या सुमारास चौधरीधाब्याजवळ बर्थ डे पार्टी आटोपून स्कॉर्पिओमधून घरी परतणाऱ्या शेतकऱ्यावर रेकॉर्डवरच्या गुन्हेगाराने साथीदाराच्या मदतीने किरकोळ कारणावरुन खुनी हल्ला केला. त्यामधे दोन जण जखमी झाले होते. त्यापैकी उपचारादरम्यान एकाचा मृत्यू झाला.

रामचंद्र हिवाळे( ३५ )धंदा शेती रा.देवळाई असे मयताचे नाव आहे. तर मनोज भालेकर, मुकुंद भालेकर, विकास घोडके सर्व रा. निपाणी व अन्य दोघे अशी निष्पन्न आरोपींची नावे आहेत. त्यापैकी मनोज भालेकरला चिकलठाणा पोलिसांनी अटक केली आहे.

५ जुलै रोजी रात्री १०वा. हिवाळे कंपनी घरी परतत असतांना आरोपी केंब्रीजकडून येत होते. त्यावेळी हिवाळे व आरोपी भालेकर यांच्या वाहनाची धडक टळली. यामुळे वाद होऊन निघाले असतांनाआरोपींनी हिवाळे यांच्या गाडीची काच दगड मारुन फोडली. म्हणून त्यांना जाब विचारण्यासाठी गेलेल्या हिवाळेंना विकास घोडके याने पोटावर चाकूचे वार करुन जखमी केले.त्यापैकी रामचंद्र हिवाळे गंभीर जखमी झाला. दोघांवरही घाटीत उपचार सुरु असतांना रामचंद्र हिवाळे याचा आज सकाळी मृत्यू झाला.घाटी मधे रामचंद्र हिवाळेच्या मृतदेहाचे शवविच्छेदन सुरु असतांना देवळाईतील नागरिकांनी गर्दी केली होती. आरोपींना अटक होईपर्यंत चिकलठाणा पोलिस ठाण्यात मृतदेह ठेवायचा अशी भूमिका घेतली. चिकलठाणा पोलिसांनी तत्परतेने पाऊले उचलत मनोज भालेकरला अटक केली. वृत्त हाती येईपर्यंत दुसरा आरोपीही पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती कळली होती. या प्रकरणी पुढील तपास पोलिस निरीक्षक रविंद्र खांडेकर करंत आहेत.



# एबीसी ग्रुप सामाजिक कार्यात सदा अग्रेसर

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** सामाजिक कार्यात सदा अग्रेसर असलेले लोहा शहरासह जिल्ह्यातच नसुन राज्य भरात नावारूपाला आलेलं धाडसी युवक नेतृत्व म्हणून ज्यांची आगळीवेगळी अशी छाप आहे असे एबीसी गृपचे अमोल बालाजीराव चव्हाण होतं. गेली वर्षेभरापासून ग्रामीण बँकेचे अधिकारी म्हणून अमोल बालाजी चव्हाण यांच्या ओळखीने आणखी भर पाडली, अशा या युवा व्यक्तिमत्वाने त्यांच्या वाढदिवसानिमित त्यांच्या मित्र परिवारांनी लोहा शहर व परिसरातील तब्बल दहा ते बारा शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व पेनाचे वाटप केले.

अनेक युवकांनी, समाजकारण्यांनी, राजकारण्यांनी दखल घेतली.जय महाराष्ट्र प्राथमिक विद्यालय, शिवछत्रपती विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक हायस्कुल धावरी, अनाथ वस्तीग्रह लोहा, जि प प्रा शाळा लोहा, डॉ. हेलन केअर अंध निवासी विद्यालय, या सह अन्य शाळेत विविध सामाजिक उपक्रम राबवत व शालेय साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. अमोल चव्हाण यांनी जालना येथे बँक अधिकारी म्हणून कार्यरत असताना सुद्धा आज घडीला ते विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात, उन्हाळ्यातील पाणीटंचाईचे दिवस पाहून त्यांनी मोफत पाणपोईचे उद्‌घाटन करून तहानलेल्यांना पाणी पाजत आपले पुण्यक्रम दाखवून दिले. विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात करतांना त्यांच्या मागील आठवणी त्यांना जागे, लोहा शहरात राबवलेले सामाजिक उपक्रम, घेतलेले शेकडोच्या संख्येने घेतलेले रक्तदान शिबिरे, कोरोना काळात गरजू रुग्णांना विविध ठिकाणी लस देण्याबाबत शिबिरे घेण्यात आली. मोफत अंडी वाटप, नाश्ता, भोजन, निवासाचे साहित्य याची दखल अनेक दैनिकांनी घेऊन त्यांनी केलेल्या पुणे व दिल्ली येथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा प्रत्यक्षात कृतीत उतरविलेले विचार फुटपाथ वरील मुलांना लोकांना केलेली मदत ही नक्कीच प्रेरणादायी ठरली. यावेळी प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, सिनेट सदस्य नवनाथ (बापू)चव्हाण, प्रणिता देवरे चिखलीकर, लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सावकार सूर्यवंशी, नगरसेवक केशवराव मुकदम, नगरसेवक बबन निर्मले, संचालक भीमराव पाटील शिंदे, शिक्षक नेते हरिभाऊ चव्हाण, माजी चेअरमन तथा मुख्याध्यापक बालाजी चव्हाण, नगरसेवक संभाजी चव्हाण, नबी शेख, मुख्याध्यापक दामोधर वडजे, हणमंत पवार सर, मोहन पाटील पवार :- जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ (निवड समिती) नांदेड, हरीहर धुतमल, भारत पाटील पवार, ज्येष्ठ पत्रकार बापू गायकर, साहेबराव सोनकांबळे, तालुकाध्यक्ष शिवराज पाटील पवार, शिवराज दाढेल, पत्रकार मारोती चव्हाण, महेश चव्हाण, दिलीप कहाळेकर, अमोल गायखर, श्रीकांत चव्हाण, पंकज चव्हाण, दीपक चव्हाण, प्रशांत शिंदे, स्वप्निल देशमुख, सूर्यकांत जामगे, मुकुल पवार, स्वप्निल कहाळेकर विजय चव्हाण सुनील जामगे, सुजित चव्हाण, कल्याण जामगे, सतीश सूर्यवंशी, ज्ञानु बुद्रुक, प्रताप वाकडे, सागर पवार आदी मित्रपरिवार उपस्थित होते.

# तर पेन्शनर्स खंबीर पाऊल उचलतील : राजपूत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय सेवा निवनिवृत कर्मचाऱ्यांना केंद्र सरकार दर महिन्याला एक हजार रुपये वैद्यकीय अंशदान देते, देशातील ईतर राज्यातही वैद्यकीय अंशदान मिळते मग महाराष्ट्र राज्यातील सेवा निवृतांना का नाही ? शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना जिल्हा कोषागारातून नियमित एक तारखेला पेंशन मिळते. खाजगी शाळेतील शिक्षकांनाही कोषागारातून पेंशन मिळते मग जि.प.सेवा निवृत्त शिक्षकांना कोषागारातून का मिळू नये ? सातव्या वेतन आयोगाचे थकीत हप्ते, पश्चिम महाराष्ट्रातिल सेवा निवृतांना वेळवर का देत नाही ? केंद्र सरकारी सेवानिवृत्तना तेरा महिन्यात पेंशन विक्री परत मिळते, मग महाराष्ट्र राज्यातील सेवा निवृतांना पंधरा वर्षे कालावधी का ? वर्ष २००५नंतर सेवेत आलेल्याना पेंशन नाही असे शासनाने आदेश काढले, परंतु देशातील ईतर बऱ्याच राज्यांनी जुनी पेंशन योजना लागू केली, महाराष्ट्र राज्यातील सेवा निवृतांना का नाही ? दुर्धर आजार किंवा अंथरूणाला खिळलेल्या पेन्शनर्स घरी पेंशन देणे हे बँकेला आदेश असताना अशा रुग्ण पेन्शनर्स ना बँकेत का बोलाविता ? अशा मागण्या धुळ्याचे अनंतराव पाटील व वैजापूरचे पेन्शनर्स संघटनेचे अध्यक्ष धोंडीरामसिंह राजपूत यांनी औरंगाबाद येथे ए.पी.जे. अब्दुल कलाम रिसर्च सेंटर येथे बुधवार( ता.५ )रोजी संपन्न झालेल्या पेन्शनर्स मेळाव्यात केली.

शासनाने या मागण्या मान्य केल्या नाही तर राज्यातील पेन्शनर्स खंबीर पाऊल उचलतील असा गंभीर इशारा या मेळाव्यात या द्वयांनी दिला. औरंगाबाद जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनने हा मेळावा वार्षिक सर्व साधारण सभे निमित आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स पुणे शिखर परिषदेचे एन.डी.मारणे होते.

प्रमुख उपस्थिती जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन तुपे होते. तर व्यासपीठावर जिल्हा शाखा अध्यक्ष व उपविभागीय उपाध्यक्ष वसंत सबनीस होते, वसंत सबनीस यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी ही वरील मागण्याचे जोरदार समर्थन केले. सुदर्शन तुपे यांनी जि.प.कडील प्रलंबित मागण्या तात्काळ निकाली काढू असा शब्द दिला.




# सावळदबारा परिसरात पाऊस, दुबार पेरणीचे संकट टळले : प्रा.मदन डोखळे

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील डाभा येथे बुधवार पासून पाऊसाने दमदार पाऊसाची हजेरी लावली.गेल्य चार दिवसांपासुन पावसाने उघडीप दिल्याने पेरणी केलेल्या पिकांना तडाखा बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत असताना मंगळवारी दि ४/७/२३ सायंकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. यामुळे तुर्तास तरी दुबार पेरणीचे संकट टळले असल्याने शेतकरी वर्गाचा जिव भांड्यात पडला आहे. गेल्या सप्ताहभरापासून परिसरात पाऊसच नव्हता. शेतकऱ्यांनी झालेल्या पावसाच्या विश्वासावर पेरण्या केल्या मात्र पाऊसच नसल्याने दुबार पेरणी करावी लागते की काय अशी भीती बळीराजाच्या मनात होती. मात्र सोयगाव तालुक्यातील सावळदबारा, देव्हारी, डाभा, टिटवी, नांदा तांडा आदि परिसरात बुधवारी सायंकाळी साडे सहा वाजता जोरदार पाऊस पडला. या भागात साठ टक्के पेरण्या पूर्ण झालेल्या आहेत. अशी माहिती प्रा. मदन डोखळे शेतकरी यांनी बोलताना सांगितले तर उर्वरित शेतकरी वर्गाने बुधवार, गुरुवार पासून पेरण्या व लागवडीच्या कामांना शेतकऱ्यांनी सुरूवात केल्याचे चित्र दिसत होते. आर्द्रा नक्षत्र बरसल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदा कापसाला भाव मिळाला नसल्यामुळे यावर्षी कपाशीची लागवड कमी होऊन मका, सोयाबीन पिकाकडे शेतकरी वर्ग वळल्याचे दिसत आहे, अशी माहिती प्रा.मदन डोखळे शेतकरी यांनी बोलताना सांगितले.

# ब्रदर फॉरेव्हर ग्रुपतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**विठ्ठल ममताबादे**

**उरण :** सामाजिक बांधिलकी हे तत्व आणि ध्येय डोळ्यासमोर ठेवून उरण तालुक्यातील चिरनेर रांजणपाडा येथील सुशिक्षित असणारे ब्रदर फॉरेवर ग्रुप रांजणपाडा चिरनेरच्या 10 ते 12 तरुणांनी एकत्र येवून रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदायलेवाडी तालुका उरण येथे दिनांक ७ जुलै २०२३ रोजी शाळेतील १६ विद्यार्थ्यांना शालेय दप्तर , शालेय लेखन साहित्य वह्या आणि पेन ,



प्रत्येकी छत्री असे शालेय उपयोगी साहित्य वाटप केले . तसेच विद्यार्थ्यांना दुपारचे उत्कृष्ठ जेवण देण्यात आले. शाळेतील मुख्याध्यापक आणि शिक्षक वर्ग यांनी ब्रदर फॉरेवर ग्रुप रांजणपाडा चिरनेर यांचे या भेटी बद्दल आभार मानले. यावेळी वाडीवरील सुशिक्षित तरुण वर्ग रोशन सुरेश कातकरी, विजया दत्ता कातकरी हे उपस्थित होते.ब्रदर फॉरेवर ग्रुप चिरनेर रांजणपाडा या ग्रुपने सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटले.



# ब्रिलियंट इंग्लिश स्कूलच्या वतीने वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** झाडे लावा झाडे जगवा हा संदेश देत आदर्श शिक्षण संस्थेच्या ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज खंडाळा बावडा या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेण्यात आला.या शाळेची स्थापना २०१३-१४ साली करण्यात आली असून यावर्षी इयत्ता १०वी च्या विद्यार्थ्यांची ही पहिली बॅच आहे.हे विद्यार्थी संस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच बोर्ड परिक्षेला सामोरे जाणार आहेत.त्यासाठी शाळेच्या आठवणी कायम सोबत राहण्यासाठी इयत्ता १०वी च्या विद्यार्थ्यांकडून शाळेच्या आवारातच वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेण्यात आला. झाडे लावल्याने हीच आठवण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने शाळेत आयुष्य भर राहणार आहे. वृक्ष संवर्धन करणारा हा महत्वाचा उपक्रम शाळेत हाती घेतल्याबद्दल शाळेचे कौतुक तर होतच आहे.शिवाय पालकांनी या बद्दल विशेष समाधान व्यक्त केलेले आहे. शाळेचे विद्यार्थी नेहमी अशा उपक्रमा साठी तयार असतात. स्वतःहून कष्ट घेत या उपक्रमात सहभागी होत असतात. याबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष जयकुमार खरात आणि सचिव स्नेहल खरात यांनी विद्यार्थ्यांचे ही अभिनंदन केले. भविष्यात हे विद्यार्थी शैक्षणिक प्रगती करुन उच्च पदावर कार्यरत असतील असा विश्वास शालेय प्रशासन व गुरुजन वर्ग याना कायम वाटत असून या उपक्रमातून शालेय विद्यार्थी यांच्या आठवणी कायम स्मरणात राहतील अशा उद्देशाने, तसेच जेंव्हा कधी हे विद्यार्थी शाळेला भविष्यात भेट देतील तेंव्हा त्यांनी लावलेल्या इवल्याशा रोपट्यांचा वृक्ष झालेला असेल आणि त्यांच्या जुन्या आठवणींना निश्चितच उजाळा मिळेल.यासाठी आज या विद्यार्थ्यांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आल्या असल्याचे सांगण्यात आलेले आहे. वृक्षारोपण प्रसंगी इयत्ता दहावीचे विद्यार्थी आणि शिक्षकवृंद तसेच काही पालकवर्ग, संस्थेचे उपाध्यक्ष जयकुमार खरात, सचिव स्नेहल खरात उपस्थित होते.

# कृषी विभागाकडून तृणधान्य बियाण्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मौजे तिडका येथे सोयगाव कृषी विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष 2023- 24 अंतर्गत खरीप मध्ये येणाऱ्या पौष्टिक तृणधान्य पिकाचे बियाणे मिनीकीट वाटप करण्यात आले. मानवी आहारात तृणधान्याचे महत्व व फायदे सांगून खरीप हंगामात पिकाचा पेरा कसा वाढवता येईल याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच 1 ते 31जुलै दरम्यान खरीप पिकांचा पिक विमा भरणे चालू झाले आहे तरी सर्व शेतकरी बांधवांनी वेळेत आपला पिक विमा भरून घेणे असे कृषी विभागामार्फत कृषी सहाय्यक सतीश बोरसे यांनी जाहीर आवाहन केले. कार्यक्रमास कृषी पर्यवेक्षक प्रदीप पाटील, गावाचे सरपंच ग्रामपंचायत सदस्य, तसेच शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# निसर्गरम्य वातावरणात पद्मगंधा प्रतिष्ठानचा 'आषाढस्य प्रथम दिवसे' कार्यक्रम संपन्न




आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पद्मगंधा प्रतिष्ठान ही साहित्यिकांची अतिशय प्रसिद्ध अशी संस्था असून तीस वर्षांपासून या संस्थेचे कार्य अविरत सुरू आहे. अनेक कार्यक्रमांच्या आयोजनापैकीच एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे आषाढस्य प्रथम दिवसेहे नव्या-जुन्यांचे कवीसंमेलन.यावर्षी या कार्यक्रमाचे 28 वे वर्ष होते. महाकवी कालिदासांचे स्मरण करून एखाद्या निसर्गरम्य स्थळी कवी संमेलनाचे आयोजन करणे आणि पावसाळी सहलीचा आनंद घेणे हे उद्दिष्ट्य ठेवून हा कार्यक्रम घेण्यात येतो. यावर्षी भारतवर्ष नेचर फॉर्मस येथे हा कार्यक्रम घेण्यात आला.. कार्यक्रमाच्या अध्यक्ष हिंदी साहित्य अकादमी प्राप्त नेहा भांडारकर होत्या. मंचावर प्रमुख अतिथी कवी शंकर घोरसे, पद्मगंधाच्या संस्थापक अध्यक्ष प्रसिद्ध लेखिका, कादंबरीकार शुभांगीताई भडभडे , राजेश अवचट आणि आयोजिका प्रा. मीनल येवले होत्या. या कार्यक्रमात पन्नास कवी आणि कवयित्रींनी सहभाग घेतला. विविध विषयांवरील आशयसमृध्द रचना या कवी संमेलनात सादर करण्यात आल्या.

एखादी कविता लोकप्रिय असणे आणि एखादी कविता श्रेष्ठ असणे यात फरक असतो. चांगल्या कवितेतील श्रेष्ठत्वाची लक्षणं कवितेत शोधताना कवितेचा विषय, पदरचना, शब्दांची निवड, ओळींमध्ये लय, शब्दांचा नाद, प्रतिमा, प्रतीकं, तत्त्वज्ञान, कवीचे आत्मभान, कवीचा दृष्टीकोण या सर्व घटकांमुळे एखादी कविता श्रेष्ठ ठरू शकते. म्हणून कवितेत या सर्व घटकांचे उत्तम संयोजन होणे गरजेचे असते. तेव्हाच एखादी कविता परिणामकारकरित्या श्रेष्ठ ठरू शकते, चांगली बनू शकते. मराठी कविता आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी तिच्यात कसे बदल व्हायला हवेत ह्या गोष्टीवर अध्यक्ष नेहा भांडारकर ह्यांनी प्रकाश टाकला. आपल्या उद्घाटनपर भाषणात बोलताना शंकर घोरसे म्हणाले की कमीत कमी शब्दात तंत्रशुद्ध पद्धतीने अधिकाधिक भाव मांडणे म्हणजे कविता होय. अंतरीचे भाव जेव्हा ताकदीने कवितेत उमटतात तेव्हा या काळजातून त्या काळजात कविता पोहोचत असते. ज्येष्ठ लेखिका पद्मगंधा प्रतिष्ठानच्या अध्यक्ष शुभांगीताई भडभडे यांनी मेघदूत काव्यावर आपले विचार मांडले. कालिदासांची नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा आजही साहित्यिकांना लुभावून टाकते. त्यांच्या प्रतिभेचे स्मरण निश्चितच ऊर्जादायी आहे असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. लीना निकम म्हणाल्या की, महाकवी कालिदास हे फक्त महाकवी नव्हते तर ते प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ, हवामान शास्त्रज्ञ, दिशा शास्त्रज्ञ, वनस्पती शास्त्रज्ञ आणि पर्यावरण शास्त्रज्ञही होते. आकाशात काळेकरडे मेघ दाटून आले आणि मृदगंध पसरला की जशी विठुरायाच्या पंढरीची वारी आठवते तसे या शब्दपंढरीच्या वारीने जीवनात नवचैतन्य निर्माण व्हावे. रश्मी पदवाड,डॉ.जयश्री पेंढारकर, प्रभा देउस्कर, स्वाती सुरंगळीकर, वृंदा जोगळेकर, राधिका राजंदेकर, विकास गजापुरे, अपर्णा कल्लावार, जयश्री अंबासकर, वर्षा देशपांडे, वीणा मानकर, रचना कन्हेर, नीता खोत, छाया पिंपळे, रेखा सोनारे, अपर्णा कुलकर्णी, डॉ. पद्मिनी दूरूगकर, डॉ. स्वाती मोहरीर, डॉ.वसुधा वैद्य, अंजली गव्हाणे, डॉ. माया रंभाळे, डॉ. संगीता बानाईत, कोकिळा खोदनकर, मंजुषा किंजवडेकर, वैशाली मुलमुले, डॉ. राजेश काळे, गीता वाळके, सुषमा सोळंकी, मेधा औरंगाबादकर, अरुणा भोंडे ,चित्रा कहाते, स्मिता वाईकर, भाग्यश्री करजगावकर, नेहा मुंजे, राजेश माहूरकर, राजू डहाके,भारती भाईक, मोनाली पोफरे, माधुरी सोनारे या कवींनी सहभाग नोंदवला.

# वसंतराव नाईक कृषी प्रेरणा पुरस्कार डॉ. संजय गायकवाड यांना प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर:** नाशिक येथील ॲग्रोकेअर कृषी मंचच्या वतीने देण्यात येणारा वसंतराव नाईक कृषी प्रेरणा पुरस्कार 2023 नांदेडचे भूमिपुत्र तथा राज्य कामगार विमा योजनेचे स्टेट नोडल अधिकारी डॉ.संजय गायकवाड यांना कृषी दिनानिमित्त नाशिक येथे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

डॉ.संजय माधवराव गायकवाड यांनी महाराष्ट्रातील राज्य कामगार विमा योजना रुग्णालये, सेवादवाखाने येथे 46 दिवस पौष्टिक तृणधान्य शिबिरे आयोजित करून 500 शेतकरी कुटुंबाना मदत केली. या कार्याची दखल घेत डॉ.संजय गायकवाड यांना राज्यस्तरीय कृषी प्रेरणा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या आधीही त्यांना विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# अजगराच्या पिलांना कृत्रिमरित्या जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** पिंपळनेर जवळील धरणाला पडलेले खड्डे बुजवण्याचे काम जलसंपदा विभागाच्या वतीने करीत असताना जेसीबी चालकाला अजगराचे ( रॉक पायथॉन ) चे अंडी आढळली. या अंडींना कृत्रिमरित्या उबवून सात अजगर सापांना जीवदान देण्यात आले. सदर जिल्ह्यातील पहिला प्रयोग यशस्वी करण्यासाठी पर्यावरण प्रेमी, सर्पमित्र व 'मी लोणारकर' टीमने पुढाकार घेतला.

अंडी आढळल्याची माहिती जेसीबी चालकाने तत्काळ जलसंधारण विभागाच्या कनिष्ठ अभियंता यांना दिली. त्यांनी वन विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याशी संपर्क केला. तसेच नियत क्षेत्रधिकारी चौधरी, सर्पमित्र विनय कुलकर्णी यांना बोलावून अजगराची ८ अंडी सुपूर्त केले. त्यापैकी जेसीबीने काम करीत असताना १ अंड्याला दुखापत झाल्याने ते कमी



झाले. परंतु, इतर ७ अंडी व्यवस्थित असल्यामुळे अंड्याना उबविण्यासाठी सर्पमित्र विनय कुलकर्णी, पर्यावरण प्रेमी 'मी लोणारकर' टीमचे सचिन कापुरे यांनी अंडी कृत्रीमरित्या उबवण्याची पेटी ( इनक्यूबेटर ) तयार केली. तसेच सतत १३ दिवस त्यांची नियमित काळजी घेतली. या कार्यात मानद वन्यजीव रक्षक बाळ काळणे अकोला यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. तसेच सर्पमित्र प्रदीप कुलकर्णी खोपोली, सर्पमित्र वनिता बोराडे हिवरा आश्रम यांनीही मोलाचे सल्ले दिले. यासाठी उपवनसंरक्षक अक्षय गाजभिये, मेहकर वनपरीक्षेत्र अधिकारी प्रकाश सावळे, 'मी लोणारकर' टीमचे विलास जाधव, सचिन म्हस्के, उमेद चिपडे, सर्पमित्र बंटी नरवाडे यांचे सहकार्य लाभले.

**नैसर्गिक अधिवासात सोडले**

कृतिमरित्या अंडी उबविल्यनंतर तब्बल १२ दिवसानंतर त्यातून एक पिलू बाहेर आले व नंतर २-३ दिवसांनी इतर सर्वच पिले बाहेर आल्याने सर्वांना आनंद झाला . दरम्यान, तालुका दंडाधिकारी तथा लोणार तहसीलदार गिरीश जोशी यांनीही या कामाची दखल घेवून कृत्रिमरित्या सात अजगरांना जीवदान दिल्याचा जिल्ह्यातील पहिला प्रयोग यशस्वी झाल्याचे सर्वांचे कौतुक केले . अजगर हा अन्नसाखळीतील खूप महत्वाचा घटक मानला जातो . त्यामुळे जीवदान मिळालेल्या सातही अजगराच्या पिल्लांना मेहकर परीक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले .

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# किशोर शितोळे म्हणजे सकारात्मकता

## मा. कुलगुरु डॉ. प्रमोद येवले यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** गेल्या चार वर्षात गुणवत्तेची सक्ती करुन सर्वांच्या सहकार्याने विद्यापीठाला योग्य वळणावर आणु शकलो याचा आनंद आहे, असे प्रतिपादन मा.कुलगुरु डॉ.प्रमोद येवले यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलपती नियुक्त अधिसभा सदस्य किशोर शितोळे व सहकारी यांनी मा.कुलगुरु डॉ.प्रमोद येवले यांची बुधवारी (दि.५) सदिच्छा भेट घेतली. यावेळी मा.कुलगुरु डॉ.प्रमोद येवले यांच्या हस्ते किशोर शितोळे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. तसेच उपस्थित सर्वांच्या वतीने मा कुलगुरूंच्या हस्ते त्यांचा सत्कारही करण्यात आला . प्रकुलगुरु डॉ.श्याम शिरसाठ, कुलसचिव डॉ.भगवान साखळे, अधिष्ठाता डॉ.प्रशांत अमृतकर, डॉ.भालचंद्र वायकर, डॉ.चेतना सोनकांबळे, डॉ.वाल्मिक सरवदे, अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ.शंकर अंभोरे, डॉ.उमाकांत राठोड, विद्या परिषद सदस्य डॉ.दिलीप अर्जुने आदींची उपस्थिती होती.

यावेळी मा.कुलगुरू डॉ. प्रमोद येवले म्हणाले, सर्वसामान्य कुटुंबातील पहिल्या पिढीचे पदवीधर घडविणारे आपले विद्यापीठ आहे. महाविद्यालयांना कुशल मनुष्यबळ व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची सक्ती केली. त्यामुळे ४०० हून अधिक विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला. किशोर शितोळे यांनी विद्यापीठात जलबंधारे उभारतानाच सकारात्मक भूमिका घेऊन व्यवस्थापन परिषदेच्या कार्यकाळात काम केले, असे गौरवोद्गार ही मा.कुलगुरु डॉ.प्रमोद येवले यांनी काढले. शितोळे यांचे सहकार ,शिक्षण सामाजिक व जलसंधारण क्षेत्रात मोठे काम असून आगामी काळात त्यांना आणखी मोठी संधी मिळेल अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या. त्यांनी कधीच काही मागितलेही नाही व कधी मी पुन्हा येईन असेही म्हणाले नाहीत, सदैव पारदर्शक, सकारात्मक व माणसं जोडण्याचं काम किशोर शितोळे हे करत राहतात हे कौतुकास्पद आहे. किशोर शितोळे यांनी सर्व समाज घटकांना सोबत घेऊन व्यवस्थापन परिषदेच्या कार्यकाळात काम केले, असे अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ.शंकर अंभोरे म्हणाले . सत्काराला उत्तर देतांना किशोर शितोळे म्हणाले की. कुलपती रमेशजी बैस यांनी अधिसभेवर काम करण्याची संधी दिली. सर्व विचारप्रवाहातील विद्यार्थ्यांना एकत्रित आणून जलदूत ही एक आज लोकचळवळ निर्माण केली आहे याचा मनस्वी आनंद आहे, समाधान आहे . सर्व घटकांना सोबत घेऊन विधायक काम करु, अशी ग्वाही किशोर शितोळे यांनी दिली. यावेळी डॉ. उमाकांत राठोड, डॉ.दिलीप अर्जुने, डॉ.क्षमा खोब्रागडे यांनीही मनोगत व्यक्त केले. अधिसभा सदस्य अरविंद्र नरोडे, पंकज भारसाखळे, डॉ.सत्यप्रेम घुमरे, डॉ.संजय सांभाळकर, दत्ता हुड, विकास ठाले, डॉ.संदीप जगताप आदींची उपस्थिती होती.

# सैनिक व शेतकरी आपले दैवत : प्रकाशराव जमदाडे

आधुनिक केसरी न्यूज

**जत/सांगली :** टोणेवाडी गावचे सुपुत्र रामचंद्र बाळू वायफळकर हे देश सेवा करून सैन्य दलातून सेवानिवृत्त झाल्याबद्दल टोणेवाडी ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी रस्त्यावर रांगोळी काढून, बैलगाडी सजवून त्यावर त्रिरंगा झेंडा लावून भव्य अशी वाजत गाजत, पुष्पवृष्टी करत मिरवणूक गावातून काढली. त्यानंतर ग्रामपंचायती समोर मोठा नागरी सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच विष्णू नुलके पोलीस पाटील चंद्रकांत टोणे व ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विद्यमान संचालक मा. श्री. प्रकाशरावजी जमदाडे साहेब, शिक्षक पत संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मण गायकवाड सर, व्हस्पेठ सोसायटीचे संचालक राजेंद्र कराळे, उद्योगपती वसंत सांगोलकर, भारत क्षिरसागर, राजाराम शिंदे, वसंत भंडे, सुभाष घोडके,रामचंद्र घोडके,संभाजी घोडके, बाबुराव घोडके, नामदेव हिप्परकर, त्यांचे नातेवाईक व ग्रामस्थांनी त्यांचा सहकुटुंब सहपरिवार सत्कार केला.

यावेळी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रकाशरावजी जमदाडे साहेब म्हणाले की, सैन्यदलात अतिशय खडतर प्रसंगाना तोंड देत रामचंद्र यांनी देश सेवा केली आहे. सैनिक म्हणजे आपले देव आहेत. सैनिक सीमेवर लढतात म्हणून आपण आपण इकडे सुखी आहे.

सैनिक, शेतकरी यांच्या कष्टावर देश अवलंबून आहे. म्हणून यांचा सन्मान करणे आपले कर्तव्य आहे. उद्योगपती वसंत सांगोलकर म्हणाले, सैन्यात सेवा केलेले रामचंद्र, त्यांचे वडील बाळासाहेब, त्याची आई व पत्नी या सर्वांचा आम्हा गावकऱ्यांना अभिमान आहे. तरुणांनी यांचा आदर्श घ्यावा व सैन्यदलात भरती होण्यासाठी प्रयत्न करावेत. यावेळी गावातली बहूसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.







गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर